जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# स्क्रॅप वादातून व्यावसायिकाचे अपहरण करत साडेचार कोटींच्या खंडणीची मागणी

नगर – स्क्रॅप मालाच्या व्यवहारातून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर येथील व्यावसायिकाचे अपहरण करून त्यांना मारहाण करत तब्बल साडेचार कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध ६ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रमेश मोहन बोगा (वय ३९, रा. श्रावस्ती बंगला, विद्या कॉलनी, आदर्शनगर, नेप्ती सबरबंद, नगर) यांनी फिर्याद दिली आहे. दिलेल्या फिर्यादीवरून संशयित आरोपी राजबीर गजराजसिंग मल्होत्रा, जुगन राजबीर मल्होत्रा (दोघे रा. मौर्य पार्क, वाडेबोल्हाई, वाघोली, पुणे), शिवाजी चंद्रकांत थोरवे (रा. आळंदी, पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, २९ मे रोजी पहाटे एकच्या सुमारास संशयित आरोपींनी फिर्यादी यांना त्यांच्या राहत्या घराजवळ गाठले. स्क्रॅप मालाचा व्यवहार न केल्याच्या रागातून संशयित आरोपींनी फिर्यादी यांना जबरदस्तीने वाहनात बसवून नेले.

यावेळी आरोपींनी फिर्यादींचे दोन मोबाईल तसेच खिशातील तीन हजार रुपये हिसकावून घेतले. यानंतर आरोपींनी फिर्यादी यांना आळंदी येथील एका फ्लॅटमध्ये नेऊन मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तुझ्यामुळे आमचे साडेचार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. ते पैसे भरून दे, अन्यथा तुला व तुझ्या कुटुंबाला जिवे मारू, अशी धमकी आरोपींनी दिल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

# केडगावमध्ये ड्रेनेज लाईनच्या टाकण्याच्या वादातून रॉडने बेदम मारहाण

नगर – केडगाव परिसरातील पाच गोडाऊन येथे ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कारणावरून दोन व्यक्तींनी एका व्यक्तीला लोखंडी रॉडने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना ६ जून रोजी घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सोमनाथ दत्तात्रय साखरे (वय ४४, रा. पाचगोडाऊन जवळ, केडगाव गावठाण) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे ६ जून रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास परिसरात असताना हा वाद झाला. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कारणावरून आरोपी कैलास शेंदुरकर आणि महेश कैलास शेंदूरकर (दोघे रा. पाचगोडाऊन, केडगाव गावठाण) यांनी फिर्यादी साखरे यांना गाठून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

हा वाद वाढल्यानंतर आरोपी कैलास शेंदुरकर याने फिर्यादी साखरे यांच्या कपाळावर लोखंडी रॉडने जोरदार प्रहार केला. यामध्ये ते गंभीर जखमी झाले. त्यानंतर आरोपी महेश शेंदूरकर याने साखरे यांना जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेनंतर जखमी सोमनाथ साखरे यांना तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयातील जबाबावरून कोतवाली पोलिसांनी आरोपी कैलास शेंदुरकर आणि महेश शेंदूरकर यांच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे.

## उत्तमराव सातपुते यांचे अल्प आजाराने निधन



नगर – केडगाव सातपुते गल्ली येथील रहिवासी उत्तमराव चिमाजी सातपुते (वय ८२) यांचे ७ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नवनाथ, रंगनाथ सातपुते, सुनिता करांडे, अनिता शिंदे यांचे ते वडील होत.

## बाळासाहेब गायकवाड यांचे अल्प आजाराने निधन



नगर – गायकवाड कॉलनी, समर्थ मठाजवळ येथील रहिवाशी बाळासाहेब (वसंत) बाबुराव गायकवाड (वय ६८) यांचे ८ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अजिंक्य गायकवाड यांचे ते वडील होत.

## अनिल रच्चा यांचे हृदयविकाराने निधन



नगर – पाईपलाईन रोड येथील रहिवाशी विद्युत ठेकेदार अनिल विठ्ठलराव रच्चा (वय ५८) यांचे ७ जून रोजी पहाटे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ भाऊ, भावजय, ३ बहिणी असा परिवार आहे.


## रत्नाबाई उंडे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – भिंगार येथील निवृत्त शिक्षिका रत्नाबाई रमेश उंडे (वय ६४) यांचे नुकतेच हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले.

त्यांच्यामागे पती, मुलगा, दोन मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत त्यांनी ३४ वर्षे सेवा केली. निवृत्त सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश उंडे यांच्या त्या पत्नी होत.

## सुवालाल शर्मा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – ख्रिस्तगल्ली (समर्थ लॉज अहिल्यानगर) येथील रहिवाशी सुवालाल सुरजमल शर्मा (वय ८३) यांचे ७ जून रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ८ जून रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे बहिण, भाचे असा परिवार आहे. त्यांनी श्री बडीसाजन ओसवाल श्रीसंघ यांची आयुष्यभर सेवा केली.


## सौ. लक्ष्मीबाई पटवेकर यांचे निधन



नगर – माळीवाडा कौठीची तालिम येथील रहिवाशी सौ. लक्ष्मीबाई तुकाराम पटवेकर (वय ७०) यांचे ७ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, ३ मुले, १ मुलगी, सुनबाई, नातवंडे असा परिवार आहे. पटवेकर मंडप डेकोरेटर्सचे संचालक विशाल पटवेकर, विकास पटवेकर यांची चुलती होत.

## विनोद गिरमे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील शेतकरी विनोद दत्तात्रय गिरमे (वय ७२) यांचे ६ जून रोजी सायं. ५ वा. अल्पशः आजारने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुभाष गिरमे यांचे धाकटे बंधू,दिगंबर गिरमे यांचे वडील,संचीत (भैय्या) गिरमे यांचे चुलते होत.

## सौ.शोभा फासाटे यांचे अपघाती निधन



श्रीरामपूर – येथील सौ.शोभा कैलास फासाटे (वय ४५) यांचे खंडाळा येथे अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात सासू–सासरे, पती, दोन मुले, दिर, पुतणे असा परिवार आहे. बबनराव मुरलीधर फासाटे यांच्या सुनबाई, पेंटिंग कॉन्ट्रॅक्टर कैलास फासाटे यांच्या पत्नी, योग प्रशिक्षक चि.सौरभ व सार्थक फासाटे यांच्या मातोश्री, संजय फासाटे यांच्या भावजई होत.



हॉस्पिटलमधील पार्किंगच्या समस्येबाबतचे निवेदन शिवसेनेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

# पार्किंगच्या नावाखाली हॉस्पिटलमधील रुग्ण व नातेवाईकांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबवा अन्यथा आंदोलन करणार

नगर – शहरातील सावेडी उपनगरातील हॉस्पिटलमध्ये अपुऱ्या पार्किंग सुविधेमुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची मोठी हेळसांड होत आहे. त्यातच महानगरपालिकेने परिसरात पे अँड पार्क लागू केल्याने रुग्णांच्या आर्थिक पिळवणुकीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. ही अन्यायकारक परिस्थिती त्वरित थांबवावी, अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम यांनी दिला आहे. या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे.

सावेडी उपनगरातील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी केवळ नगर शहरातूनच नव्हे, तर बाहेरील जिल्ह्यांतूनही रुग्ण मोठ्या संख्येने येतात. मात्र, हॉस्पिटल प्रशासनाकडून पार्किंगची पुरेशी व्यवस्था करण्यात आलेली नाही. जागा नसल्याने रुग्ण व नातेवाईकांना आपली वाहने रस्त्यावर उभी करावी लागतात. त्यातच मनपाने या परिसरात पे अँड पार्क सुरू केल्याने आधीच आजारपणाच्या विळख्यात असलेल्या आणि आर्थिक संकटात असलेल्या रुग्णांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडत आहे, हॉस्पिटल परिसरात सुरू करण्यात आलेली पे अँड पार्क सुविधा तात्काळ बंद करावी, हॉस्पिटल प्रशासनाने स्वतःची पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देणे ही त्यांची जबाबदारी आहे, त्यामुळे प्रशासनाने त्यांना तातडीने तसे निर्देश द्यावेत.योग्य पार्किंग सुविधा नसल्यास हॉस्पिटल प्रशासनावर महानगरपालिकेने कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देताना शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम यांनी स्पष्ट केले की, रुग्णालयाने स्वतःची सोय न करता सामान्य नागरिकांच्या खिशातून पैसे काढणे हे अन्यायकारक आहे. जर प्रशासनाने यावर तातडीने कार्यवाही केली नाही, तर शिवसेना आपल्या पारंपारिक आक्रमक पद्धतीचे आंदोलन करेल. यावेळी बाळासाहेब बोराटे, विक्रम राठोड, दत्तात्रय कावरे, कुणाल खेरे, परेश लोखंडे, अभिजित अष्टेकर, प्रा. विशाल शितोळे, तृप्ती साळवे, संग्राम कोतकर, अरुण झेंडे, संजय शेंडगे, चंद्रकांत शेळके, विनय वाखुरे, प्रताप गडाख, संदीप दातरंगे, सलोनी शिंदे आणि नलिनी गायकवाड यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# हज यात्रेकरूंच्या ‘लगेज विलंबाच्या प्रकरणा’वर ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डची तीव्र नाराजी

## देशव्यापी आंदोलनाचा इशारा



हज यात्रेकरूंच्या लगेज विलंबाच्या प्रकरणावर ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डची बैठक पार पडली.

नगर – हज यात्रेकरूंच्या लगेजमध्ये झालेल्या कथित चोरी, छेडछाड आणि सामान वितरणातील विलंबाच्या प्रकरणावर ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डने तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित यंत्रणांकडे प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणाची तात्काळ दखल न घेतल्यास देशव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही बोर्डाने दिला आहे.

ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डचे नॅशनल जनरल सेक्रेटरी अंजर अन्वर खान यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हज कमिटी ऑफ इंडिया, केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, परराष्ट्र मंत्रालय तसेच विमानतळ प्राधिकरण यांनी हज यात्रेकरूंना त्यांचे सामान वेळेवर का मिळाले नाही याबाबत स्पष्टीकरण द्यावे.

खान यांनी म्हटले की, इतकी कडक सुरक्षा व्यवस्था, देखरेख आणि तपासणी यंत्रणा अस्तित्वात असताना लगेजमधून चोरी आणि वस्तूंची छेडछाड कशी झाली? यात्रेकरूंच्या बॅगांचे लॉक कोणी तोडले? हज यात्रेकरूंचे सामान सुरक्षित ठेवण्यात संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असतील तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार?

ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डने या प्रकरणात तातडीने कारवाई करण्याची मागणी करत काही प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये प्रत्येक विमानतळ आणि लगेज हबमधील सीसीटीव्ही फुटेजची सखोल तपासणी करणे, चोरी गेलेले मौल्यवान सामान शोधून परत मिळवून देणे, प्रभावित यात्रेकरूंना संपूर्ण नुकसानभरपाई देणे, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करणे तसेच विमानतळ प्राधिकरण आणि संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणाची उच्चस्तरीय चौकशी करणे यांचा समावेश आहे.

या प्रकरणाचा तात्काळ निकाल लावण्यात आला नाही तर ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्ड देशभर आंदोलन आणि जनजागृती मोहीम सुरू करण्यास भाग पडेल, असा इशाराही बोर्डाने दिला आहे. हज यात्रेकरू हे अल्लाहचे पाहुणे आहेत. त्यांच्या सन्मानाशी आणि सुरक्षिततेशी संबंधित कोणतीही निष्काळजीपणा किंवा गैरव्यवहार सहन केला जाणार नाही, असेही अंजर अन्वर खान यांनी स्पष्ट केले.

अधिक माहितीसाठी ऑल इंडिया उलेमा बोर्ड रजिस्टर्डचे नॅशनल जनरल सेक्रेटरी अंजर अन्वर खान– ८४३२२२३३७३

# स्वस्त सोन्याचे अमिष दाखवून लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## २६ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त





आरोपींच्या ताब्यातून हस्तगत केलेले पैसे व इत्यारे.

नगर – स्वस्त दरात सोने देण्याचे अमिष दाखवून फिर्यादीला लुटणाऱ्या आणि मारहाण करणाऱ्या आंतरजिल्हा दरोडेखोर टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले नांदेड आणि यवतमाळ भागातील या पाच आरोपींच्या मुसक्या आवळत पोलिसांनी त्यांच्याकडून तब्बल २६ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी अविनाश अनिल नलावडे (रा. सणसवाडी, ता. मानगाव, जि. रायगड) यांनी फिर्याद दिली. आरोपी राजु मोहिते आणि अक्षय मोहिते यांनी नलावडे यांचा विश्वास संपादन करून त्यांना स्वस्त दरात सोने देण्याचे आमिष दाखवले. त्यानुसार ४ जून २०२६ रोजी सायंकाळी ७ ते ७:३० च्या दरम्यान नलावडे यांना अहिल्यानगर तालुक्यातील बुरुगाव शिवारातील रेल्वे उड्डाणपुलाजवळ बोलावले. तिथे आरोपींनी फिर्यादी आणि साक्षीदारांना लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांच्याकडील रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा एकूण ५२ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने चोरून नेला. या प्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दरोड्याचा हा गुन्हा गांभीर्याने घेत आरोपींना तात्काळ अटक करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना दिले होते. त्यानुसार कबाडी यांनी विशेष पथक तयार केले. गुप्त माहितीच्या आधारे पथकाने नांदेड जिल्ह्यातील झेंडीगुळा (लोणी) ता. किनवट येथे धाड टाकून पाच जणांना शिताफिने ताब्यात घेतले. शिवाजी उर्फ शिवा विठ्ठल मोहिते (वय ५२, रा. झेंडीगुळा, ता. किनवट, जि. नांदेड), राजु उर्फ चंदु रामदास मोहिते (वय ३६, रा. झेंडीगुळा, ता. किनवट, जि. नांदेड), अक्षय उर्फ आकाश रामदास मोहिते (वय २७, रा. मालठा, ता. हातगाव, जि. नांदेड), छगन दशरथ मोहिते (वय ३६, रा. याडी, ता. नेर, जि. यवतमाळ), ५) दिनेश सुदाम जाधव (वय २४, रा. दगडवाडी, ता. हातगाव, जि. नांदेड) अशी आरोपींची नावे आहेत.

आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून, पोलिसांनी त्यांच्याकडून १६ लाख ५० हजार रुपये रोख, १ लाख ९० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, ८ लाख रुपये किमतीची एक स्विफ्ट कार, बनावट सोन्याची नाणी आणि कोयता असा एकूण २६ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अहिल्यानगर तालुका पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, सपोनि हरिष भोये, पोउपनि अनंत सालगुडे आणि त्यांच्या पथकाने केली.

# अहिल्यानगर–मनमाड महामार्गावर दुचाकीच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

नगर –नगर–मनमाड महामार्गावर एका भरधाव अज्ञात दुचाकीने रस्त्याच्या कडेने पायी जाणाऱ्या वृद्धाला पाठीमागून जोराची धडक दिली. या भीषण अपघातात ८५ वर्षीय वृद्धाचा गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाला आहे. अपघात केल्यानंतर दुचाकी चालक पोलिसांना किंवा अपघाताची कोणतीही खबर न देता घटनास्थळावरून फरार झाला आहे. ही घटना ५ जून रोजी रात्री ८.३० वाजेच्या सुमारास विळद घाटातील हॉटेल अर्पित समोर घडली.

परसराम काका काळे (वय ८५, रा. वडगाव गुप्ता, ता. नगर) असे अपघातात मृत्यू झालेल्या वृद्धाचे नाव आहे. याप्रकरणी त्यांचा मुलगा नवीन परसराम काळे (वय ३९) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मयत परसराम काळे हे ५ जून रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास नगर ते मनमाड रोडने रस्त्याच्या कडेने पायी जात होते. ते विळद घाटातील हॉटेल अर्पित समोर आले असता, पाठीमागून आलेल्या एका अज्ञात दुचाकी चालकाने काळे यांना पाठीमागून जोराची धडक दिली. या धडकेत गंभीर जखमी झाल्याने काळे यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात ७ जून रोजी अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६, १२५ (अ) (ब), २७९ सह मोटर वाहन कायदा कलम १३४ (अ) (ब), १७७, १७८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वाहन विक्री शोरूमची ४१ लाखांची फसवणूक करणाऱ्या दोघांना अटक



वाहन विक्री शोरूमची ४१ लाखांची फसवणूक करणाऱ्या दोघांना अटक केल्यानंतर त्यांच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

नगर – नामांकित वाहन विक्री शोरूमची तब्बल ४१ लाख रूपयांची फसवणूक करून पाच नवीन स्विफ्ट डिझायर टुरिस्ट परमीट कार ताब्यात घेतलेल्या दोघांना कोतवाली पोलिसांनी अटक केली असून फसवणुकीत मिळविलेल्या पाचही कार जप्त करण्यात यश मिळविले आहे. बनावट बँक मेसेज, खोटे यूटीआर क्रमांक आणि न वटणारे धनादेश देऊन ही फसवणूक करण्यात आली होती.

सावेडी येथील निर्मलनगर परिसरातील पवन गुरूनाथ पांडव (वय ३८) व संतोष त्रिंबक दळवी (वय ४४) यांनी ३ जानेवारी २०२६ रोजी शिल्पा गार्डनसमोरील महालक्ष्मी ऑटोमोटिव्ह मारूती सुझुकी शोरूममधून पाच नवीन स्विफ्ट डिझायर टुरिस्ट परमीट कार खरेदी केल्याचे भासविले. या वाहनांची एकूण किंमत ४१ लाख रूपये होती. संशयित आरोपींनी शोरूम व्यवस्थापनाला वाहनांच्या किंमतीची रक्कम भरल्याचे दाखविण्यासाठी बनावट बँक व्यवहाराचे मेसेज व यूटीआर क्रमांक पाठविले. त्यानंतर शोरूमकडून पाच वाहनांची डिलिव्हरी घेण्यात आली.

मात्र प्रत्यक्षात शोरूमच्या खात्यात एकही रूपया जमा झाला नव्हता. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांनी २ जून रोजी दोन्ही संशयित आरोपींना अटक करून न्यायालयाकडून पोलीस कोठडी मिळविली. चौकशीदरम्यान त्यांच्याकडून तीन कार जप्त करण्यात आल्या. तसेच विक्री केलेल्या उर्वरित दोन वाहनांचा शोध घेऊन तीही पोलिसांनी ताब्यात घेतली.

ही कारवाई निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, स.फौ. अशोक सरोदे, सुनील भिंगारदिवे, पोलीस अंमलदार बाळकृष्ण दौंड, विशाल दळवी, विनोद बोरगे, विजय काळे, संदीप पितळे, दीपक रोहकले, सत्यजित शिंदे, सुरज कदम, शिरीष तरटे, अतुल कोतकर, रमेश शिंदे, अमोल गाढे, अतुल काजळे, अतुल लाटे, सचिन लोळगे, संकेत धिवर महिला पो. कॉ. पल्लवी रोहकले यांच्या पथकाने केली.

# कृपाल आश्रमातील दानपेटीतून चोरट्यांनी रोकड पळविली

नगर –शहरातील उपनगरी भागात गजबजलेल्या लोकवस्तीत असलेल्या मिस्किन नगर भागातील कृपाल आश्रम आध्यात्मिक संस्थेमध्ये अज्ञात चोरट्याने धाडसी चोरी केल्याची घटना ७ जून रोजी सकाळी उघडकीस आली आहे. चोरट्याने आश्रमाच्या दरवाजाचा कडीकोयंडा आणि कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर आश्रमातील लाकडी दानपेटी फोडून त्यामधील १७,३०० रुपयांची रोख रक्कम चोरून नेली आहे.

याप्रकरणी आश्रमाचे सचिव सुशिल रामलाल बजाज यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुशिल बजाज आणि राकेश शिवकुमार छाबरिया यांनी घटनेच्या आदल्या रात्री ६ जून रोजी दानपेटीतील रक्कम तपासून ती पुन्हा पेट्यात सुरक्षित ठेवली होती. त्यानंतर आश्रम व्यवस्थित बंद करण्यात आला होता. ७ जून रोजी पहाटे कमलेश छाबरिया हे आश्रम उघडण्यासाठी गेले असता, त्यांना दरवाजाचे कुलूप आणि कडीकोयंडा तुटलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यांनी तातडीने या घटनेची माहिती सुशिल बजाज यांना दिली. सर्वांनी आत जाऊन पाहिले असता दानपेटी फुटलेली होती आणि त्यातील सर्व रोकड गायब होती.

आश्रमातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रीकरण तपासले असता, रात्री पावणेतीन ते तीन वाजेच्या सुमारास एक अनोळखी चोरटा आश्रमात शिरल्याचे आणि चोरी करताना स्पष्टपणे दिसून आले. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे आणि महिला पोलीस अंमलदार अनिता मरभळ करत आहेत. या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलीस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्याचा शोध घेत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### रिकाम्यापोटी खा सफरचंद...

दररोज एक सफरचंद, डॉक्टरला ठेवा दूर ही म्हण केवळ बोलण्यापुरती नाही. आधुनिक विज्ञान आणि आयुर्वेद दोन्ही सांगतात की सकाळी रिकाम्या पोटी सफरचंद खाणे हे आरोग्यासाठी वरदान ठरते. सफरचंद हे फायबर, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम आणि शक्तिशाली अँटिऑक्सिडंट्सचे भांडार आहे. रात्रीच्या उपवासानंतर शरीर जेव्हा पोषक तत्वांसाठी आसुसलेले असते, तेव्हा सफरचंदातील पोषक घटक थेट रक्तात मिसळतात आणि शरीराला दिवसभराची ऊर्जा देतात. सकाळी उठल्यावर सर्वात आधी पाणी पिण्याची सवय अनेकांना असते. पण त्यानंतर १५-२० मिनिटांनी जर तुम्ही सालासकट एक सफरचंद खाल्ले तर तुमच्या शरीरात चमत्कारिक बदल घडू लागतात. सफरचंदातील 'पेक्टिन' नावाचे विद्राव्य फायबर पचनसंस्था सुरळीत करते. यामुळे बद्धकोष्ठता, गॅस आणि ॲसिडिटी यांसारखे पोटाचे विकार हळूहळू कमी होतात. आतड्यांची हालचाल सुधारल्याने शरीरातील साचलेला मळ बाहेर पडतो आणि पोट हलके वाटते. सफरचंदात असलेले फायबर आणि पाणी यामुळे पोट बराच वेळ भरल्यासारखे वाटते. त्यामुळे सकाळी नाश्त्यात बाहेरचे तळलेले पदार्थ किंवा जास्त कॅलरीज खाण्याची इच्छा होत नाही. याचा थेट परिणाम वजन नियंत्रणावर होतो. लठ्ठपणाशी झगडणाऱ्यांसाठी हा एक सोपा आणि नैसर्गिक उपाय आहे.

## पाककला

### रोझ मिल्क केक

**साहित्य :** मैदा १ कप बेकिंग पावडर, १ टीस्पून बेकिंग सोडा, १/४ टीस्पून दही, १/२ कप पिठीसाखर, ३/४ कप तेल, ३/४ कप दूध, १/४ कप रोज इसेन्स, १ टीस्पून गुलाबी फूड कलर २३ थेंब, दूध १.५ कप कंडेन्स्ड मिल्क, १/४ कप रोज सिरप, ३ टेबलस्पून फ्रेश क्रीम १/४ कप, व्हिप्ड क्रीम १ कप, पिस्ता काप २ टेबलस्पून, वाळलेली गुलाबपाकळी १ टेबलस्पून

**कृती :** मैदा, बेकिंग पावडर, बेकिंग सोडा, दही + साखर फेटा. तेल, दूध, रोज इसेन्स, फूड कलर मिक्स करा. कोरडे मिश्रण ओल्या मिश्रणात घालून बॅटर तयार करा. १८० सेल्सिअसला २५-३० मिनिटे बेक करा. केक थंड करा. दूध, कंडेन्स्ड मिल्क, रोज सिरप, क्रीम मिक्स करून रोज मिल्क बनवा.

केकला टोचे मारून थंड रोज मिल्क वर ओता. २ तास फ्रिजमध्ये मुरवा. व्हिप्ड क्रीम लावा. पिस्ता व गुलाबपाकळीने सजवा.

## वास्तू

### मास्टर बेडरुम संबंधी

✻ मास्टर बेडरूमची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बेडची दिशा. वास्तुशास्त्रानुसार बेड नेहमी दक्षिण किंवा पश्चिम भिंतीला टेकवून ठेवावा आणि झोपताना डोके दक्षिण दिशेला करावे. यामुळे शरीरातील चुंबकीय क्षेत्र पृथ्वीच्या क्षेत्राशी जुळते आणि गाढ, स्वप्नविरहित झोप लागते.

✻ खोलीतील रंगसंगतीचा थेट परिणाम आपल्या मनावर होतो. मास्टर बेडरूमसाठी क्रीम, ऑफ-व्हाईट, बेज, लाईट पिंक, लव्हेंडर किंवा पेस्टल ब्लू सारखे सौम्य रंग निवडा. हे मन शांत करतात.

## सौंदर्य

✻ खालच्या वॉटरलाईनवर काळ्या ऐवजी पांढरा किंवा स्किन कलरचा काजळ लावा. डोळे लगेच मोठे व उजळ दिसतात.

✻ लायनर डोळ्याच्या मधोमधून सुरू करून बाहेरच्या बाजूला थोडा विंग द्या. आतल्या कोपऱ्यापर्यंत पूर्ण लावू नका.

## सल्ला

✻ सिलेंडरवर A-२५, B-२६ असं लिहिलेलं असतं. ही एक्सपायरी डेट असते.

✻ गॅस शेगडीजवळ मिक्सर, ओव्हनसारख्या वस्तूंची प्लग काढून ठेवा. लीक झाल्यास स्पार्कने आग लागू शकते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. ९ जून २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ कृष्णपक्ष, पू.भा.०९|४०, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात नवीन संधी मिळेल. उत्साहवर्धक दिवस. कुटुंबाशी संवाद वाढेल. आर्थिक लाभाचे योग.

**वृषभ :** आर्थिक बाबतीत चढ-उतार. खर्च वाढेल. जवळच्या व्यक्तींसोबत वेळ चांगला जाईल. प्रेम संबंधात गोडवा.

**मिथुन :** बौद्धिक कामात यश मिळेल. नवीन प्रकल्प सुरू होतील. मित्रांचे सहकार्य मिळेल. करिअरमध्ये प्रगती.

**कर्क :** कुटुंबात आनंदी वातावरण. खर्च वाढू शकतो. व्यावसायिक निर्णय पुढे ढकलले जातील. मानसिक शांतता मिळेल.

**सिंह :** नेतृत्व गुण दिसतील. वरिष्ठांकडून प्रशंसा मिळेल. नवीन जबाबदारी मिळेल. उष्णतेचा त्रास होऊ शकतो.

**कन्या :** कुटुंबात वादाची शक्यता. कामात मेहनतीची दखल घेतली जाईल. व्यवसाय फायदेशीर. गुंतवणुकीतून लाभ.

**तूळ :** दिवस फलदायी आहे. आर्थिक बाबतीत सावध रहा. जोडीदारासोबत वेळ चांगला जाईल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.

**वृश्चिक :** वाहन किंवा मालमत्ता मिळण्याचे योग. प्रेम जीवनात गैरसमज होऊ शकतो. नोकरीत बदलाचे संकेत.


**धनु :** दिवस मिश्रित राहील. प्रवासाचे योग आहेत. धार्मिक स्थळाला भेट द्याल. घरात पाहुणे येतील.

**मकर :** दिवसाची सुरुवात चांगली. चंद्र मकर राशीतून त असल्याने फायदा. स्पर्धेत यश मिळेल.

**कुंभ :** आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. खर्चावर नियंत्रण ठेवावे लागेल. नात्यात गैरसमज होऊ शकतो.

**मीन :** वादावर तोडगा सापडेल. आर्थिक स्थिती सुधारेल. युरेनसचा प्रभाव राहील. नोकरीत नवीन संधी.

## शब्दगंध क्र. ७४४७ सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७४४६ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | सा | म | ■ | सा | मा | जि | क |
| स्वा | मी | स | म | र्थ | ■ | ग | र |
| द | ल | ■ | ■ | क | स | र | त |
| ■ | ■ | स | र्च | ■ | ■ | बा | ल |
| अ | ज | ब | ■ | ■ | आ | ज | ■ |
| द | ■ | ल | ग | ब | ग | ■ | ग |
| पा | वा | ■ | वा | ■ | म | ग | ज |
| व | र | प | क्ष | ■ | न | ज | र |

**आडवे शब्द :-** १) अंजनीचा मुलगा म्हणून हनुमनाला असेही म्हटले जाते ६) मासे पकडण्याची आकडा लावलेली काठी ७) आपली मातृभूमी १०) आच्छादन; रेशमाच्या किड्यांचे घर ११) वेगाने वाहणारी हवा; वारा १३) एक सुगंधी लाकूड व त्याचे झाड १४) एक शिवगण १५) वाव; संधी १६) गळ्यात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना १८) एकरूप; तादात्म्य २२) दृष्टी २३) गोळा करणे; जमविणे

**उभे शब्द :-** १) रामायणातील किष्कंधानगरीचा वानरराज वालीचा मुलगा २) पाणी; नीर; जीवन ३) आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढा दिलेले थोर सेनानी ४) त्याअर्थी; 'जर'चा जोडीदार ५) जमलेल्या लोकांचा समूह ८) भास्कर; रवि; सूर्य ९) गायनात निरनिराळ्या सुरांनी केलेला रागाचा विस्तार १२) पिसारा फुलविणारा पक्षी १४) योगासनातील एक प्रकार १५) एक प्रकारचे गीत १७) स्वामी; पती; नवरा १९) मला २०) रड; रडगाणे २१) एक तंतुवाद्य

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** माफी मागणे म्हणजे तुम्ही चुकलात असं नाही, तर नातं टिकवणं महत्वाचं आहे हे दाखवणं आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### खूप हसल्यावर पोट का दुखते?

मित्रांसोबत गप्पा मारताना पोट धरून हसल्यानंतर अचानक पोटात कळ येते. हा अनुभव सर्वांनाच आला असेल. हसणे आरोग्यासाठी चांगले असले तरी पोट का दुखते, हे दुखणे सामान्य आहे का, याबाबत अनेकांच्या मनात शंका असते. यामागील शास्त्रीय कारणे समजून घेतली की भीती वाटणार नाही.

हसणे ही फक्त तोंडाची क्रिया नसून पूर्ण शरीराचा व्यायाम आहे. जोरात हसताना डायाफ्राम नावाचा स्नायू वेगाने आकुंचन पावतो. छाती आणि पोटामधला हा स्नायू मिनिटाला १०० पेक्षा जास्त वेळा हालतो. कोणताही स्नायू इतक्या वेगाने काम केल्यावर थकतोच. जसे धावल्यावर पायात गोळा येतो, तसेच डायाफ्राम थकल्याने बरगडीखाली कळ येते. हसताना पोटाचे सिक्स पॅक स्नायू म्हणजेच Rectus bdominis देखील जोरात आकुंचन पावतात. २-३ मिनिटे खळखळून हसणे म्हणजे ५० सिट-अप्स मारल्यासारखे आहे. त्यामुळे पोटाचे स्नायू दुखतात. सोबतच पोटाच्या आत दाब वाढतो. हा दाब आतड्यांवर पडतो. पोटात गॅस असेल किंवा जेवणानंतर लगेच हसले तर हा त्रास जास्त जाणवतो. सतत हसल्याने श्वास घ्यायला वेळ मिळत नाही. ऑक्सिजन कमी पडल्याने स्नायूंमध्ये Lactic Acid तयार होते. हेच ॲसिड साचून कळ येते. हसताना मेंदूतून एंडॉर्फिन हे पेनकिलर हार्मोन बाहेर पडते. हसणे थांबल्यावर ते कमी होते आणि दुखणे जाणवू लागते.

आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे ऑक्सिजनची कमतरता. आपण जेव्हा सलग हसतो तेव्हा श्वास घ्यायला विसरतो. फुफ्फुसात हवा पूर्ण भरली जात नाही. शरीरातील स्नायूंना काम करण्यासाठी ऑक्सिजन लागतो. तो न मिळाल्याने स्नायूंमध्ये Lactic cid नावाचे रसायन तयार होते. हेच लॅक्टिक ॲसिड साचल्यामुळे स्नायू आखडतात आणि दुखायला लागतात. व्यायाम केल्यानंतर दुसऱ्या दिवशी अंग दुखते त्याचेही हेच कारण असते. हसण्याचा आणि वेदनेचा संबंध मेंदूतील रसायनांशीही आहे. हसताना मेंदूतून एंडॉर्फिन नावाचे संप्रेरक स्त्रवते.

याला नैसर्गिक पेनकिलर म्हणतात. त्यामुळे हसताना आपल्याला दुखण्याची जाणीव कमी होते. पण जसे हसणे थांबते तसे एंडॉर्फिनचे प्रमाण कमी होते आणि मग दाबलेले दुखणे एकदम जाणवायला लागते. म्हणूनच हसताना दुखत नाही, पण हसून झाल्यावर कळ येते.

साधारणपणे ५ मिनिटांत ही कळ थांबते. पण ३० मिनिटांपेक्षा जास्त वेळ तीव्र वेदना, ताप, उलटी सोबत असेल तर अपेंडिक्स, हर्निया किंवा अल्सरचे लक्षण असू शकते. अशावेळी डॉक्टरांना दाखवा. हसताना मधेच दीर्घ श्वास घ्या. वाकून न हसता ताठ बसा. जेवणानंतर १ तासाने हसा. रोज थोडा व्यायाम केल्याने पोटाचे स्नायू मजबूत होतात आणि त्रास कमी होतो.

थोडक्यात, हसल्यावर पोट दुखणे सामान्य आहे. हे तुमचे स्नायू काम करत असल्याचे लक्षण आहे. त्यामुळे मनसोक्त हसा, पण वेदना असह्य झाल्यास दुर्लक्ष करू नका.

### 'हो ला हो'

कोरोना काळात वर्क फ्रॉम होम सुरू झालं आणि सगळ्या ऑफिसच्या मीटिंग झूमवर व्हायला लागल्या. टेकसोल्यूशन्स नावाच्या कंपनीतही दर सोमवारी सकाळी ११ वाजता टीम मीटिंग असायची. टीम लीडर अमित सर सगळ्यांना जॉइन करायला लावायचे. अमित सरांच्या घरात एक खास गोष्ट होती - मिथू नावाचा एक बोलका पोपट. अमित सर काम करताना मिथूचा पिंजरा नेहमी टेबलाशेजारी ठेवायचे. सुरुवातीला झूम मीटिंगमध्ये मिथूचा आवाज आला की सगळे हसायचे.

अमित सर म्हणायचे, तो फक्त ऐकतोय, डिस्टर्ब नाही करणार.मीटिंगमध्ये अमित सर रोज तेच बोलायचे, गाईज, दिस इज क्रुशियल प्रोजेक्ट. वी हॅव टू डिलिव्हर ऑन टाइम. क्लायंट इज वेरी इम्पॉर्टंट. सगळी टीम कॅमेरा ऑन करून मान डोलवायची, येस सर, राईट सर, वी विल डू इट सर. कुणीच प्रश्न विचारायचे नाहीत. टार्गेट कसं पूर्ण करायचं, अडचणी काय आहेत, हे कुणीच बोलायचं नाही. कारण अमित सरांना 'नाही' ऐकलेलं आवडायचं नाही.हळूहळू मिथू पोपटाने सगळे डायलॉग पाठ केले. अमित सर म्हणाले की, वी हॅव टू डिलिव्हर ऑन टाइम, की मागून मिथूचा आवाज यायचा, ऑन टाइम! ऑन टाइम!

सर म्हणाले, क्लायंट इज गॉड, की मिथू ओरडायचा, गॉड! गॉड! सुरुवातीला सगळ्यांना मजा वाटली. पण नंतर लक्षात आलं की आपण सगळेही मिथूसारखेच वागतोय. एक दिवस प्रोजेक्टमध्ये मोठी अडचण आली. सर्व्हर डाऊन झाला होता आणि क्लायंटचा डेटा ॲक्सेस होत नव्हता. टीमला माहीत होतं की टाईमवर डिलिव्हरी अशक्य आहे. तरीही मीटिंगमध्ये अमित सर म्हणाले, नो एक्सक्युजेस. वी हॅव टू डिलिव्हर ऑन टाइम. सगळ्यांनी नेहमीप्रमाणे मान हलवली, येस सर. पण तेवढ्यात मिथू मोठ्याने ओरडला, इम्पॉसिबल! इम्पॉसिबल!झूमवर एकदम शांतता पसरली. अमित सरांना प्रथम राग आला, पण नंतर त्यांनी मॉनिटरवर सगळ्यांचे चेहरे पाहिले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर तेच लिहिलेलं होतं जे मिथू बोलला होता 'इम्पॉसिबल'. त्या दिवशी पहिल्यांदा टीममधल्या प्रिया नावाच्या मुलीने हिम्मत करून माईक ऑन केला.

ती म्हणाली, सर, सर्व्हर प्रॉब्लेममुळे आम्ही खरंच आत्ताच डिलिव्हर करू शकत नाही. आम्हाला २ दिवस एक्स्ट्रा लागतील आणि IT सपोर्टची गरज आहे.

अमित सर क्षणभर थांबले. त्यांनी मिथूकडे पाहिलं. पोपट आता गप्प बसला होता. सरांना कळलं की इतके दिवस आपण फक्त पोपटांची टीम बनवली होती, जी फक्त 'हो सर' म्हणते. त्यांनी त्या दिवशी पहिल्यांदा विचारलं, ओके टेल मी, एक्झॅक्ट प्रॉब्लेम काय आहे? त्यानंतर मीटिंगचं स्वरूप बदललं.

अमित सरांनी नियम केला की मीटिंगमध्ये प्रत्येकाने एक प्रॉब्लेम आणि एक सोल्यूशन सांगायचंच. 'येस सर' बोलायला बंदी. हळूहळू टीम खरंच बोलायला लागली. प्रोजेक्ट डिले झाला पण क्लायंटला खरी परिस्थिती सांगितल्यामुळे त्यानेही समजून घेतलं. उलट आपण खोटं बोललो नाही म्हणून त्याने पुढचा मोठा प्रोजेक्टही दिला.आता अमित सर मीटिंगच्या वेळी मिथूचा पिंजरा दुसऱ्या खोलीत ठेवतात. ते हसत म्हणतात, मीटिंगमध्ये एक पोपट पुरेसा आहे, तो म्हणजे मी. माझी टीम आता माणसांसारखी विचार करते.

तात्पर्य : मीटिंग म्हणजे फक्त ऑर्डर ऐकण्याची जागा नसते. तिथे चर्चा झाली, प्रश्न विचारले गेले आणि खरे प्रॉब्लेम समोर आले तरच टीम पुढे जाते. नाहीतर आपण सगळेच पिंजऱ्यातल्या पोपटासारखे फक्त 'हो ला हो' म्हणत राहतो.

## आत्मशक्ति



### ध्वनिलहरी

जर आम्ही सैध्दांतिक बाजू पाहिली तर वेगवेगळ्या धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासाने आम्हाला समजते की आम्ही शरीर नसून ह्या शरीरांत राहणारा आत्मा आहोत. आत्मा आहे म्हणूनच शरीरात प्राण आहे. जीवन आहे. जोपर्यंत शरीरात आत्मा राहतो तोपर्यंतच आम्ही जीवंत राहतो; आणि जेव्हा आत्मा हे शरीर सोडून जातो, तेव्हा शरीर मृत होते. शरीर नाशवंत आहे तर आत्मा अमर आहे. ह्या शरीराचा मृत्यु झाल्यानंतर सुध्दा आत्मा जीवंतच राहतो.

आम्ही आपल्या शरीराबद्दल सर्व काही जाणतो, कारण त्याला आम्ही बघू शकतो. त्याला स्पर्श करु शकतो. त्याच्यापासून प्रसार पावणाऱ्या ध्वनिलहरी आम्ही ऐकू शकतो. पण आत्मा कोठे आहे ? कोण आहे ? ह्याची ओळख आम्ही कशी काय करून घ्यावी? त्याची वैशिष्ट्ये काय आहेत? हे सांगतांना हे पुस्तक आमची दोन पध्दतीने मदत करते.

सैध्दांतिक बाजू आम्हाला समजावून सांगते की, आमचे खरे स्वरुप म्हणजे 'आत्मा' आहे. व्यावहारिक बाजू आम्हांला आत्मज्ञानाची क्रिया समजावून सांगते; आत्मा काय आहे व त्याला आम्ही जागृत कसे करावे, हे स्पष्ट करते.

ह्या पुस्तकांत वापरल्या गेलेल्या काही शब्दांचे अर्थ मी स्पष्ट करतो, म्हणजे कोणताही गैरसमज राहणार नाही. आत्मा म्हणजे आमचे खरे रुप वा आमची अध्यात्मिक बाजू; आमचा तो भाग जो मृत्युनंतरही जीवंत राहतो. आत्म्याचे अस्तित्व नेहमीच असते मग तो शरीर व मनाला जोडून असो की सोडून गेलेला असो! जेव्हा हा ह्या जगांत येतो तेव्हा त्याला एक शरीर आणि मन दिले जाते म्हणून मानव

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### विनम्रता

अभिनेता म्हणून तुमच्या लोकांकडून कोणत्या अपेक्षा होत्या ?

सुरेश ओबेरॉय त्यांनी मला पसंत करावं.

शिवानीदीदी :

तुम्हाला खास वागणूक हवी होती. अभिनेता होण्याआधी तुमच्या अपेक्षा अशा नव्हत्या. आपण आयुष्यात काय मिळवतो त्याप्रमाणे आपल्या अपेक्षा तयार होतात. असं असलं तरीही गोष्टी मिळवण्यात काहीच चुकीचं नाहीये.

समजा, पूर्वी आपण छोट्या घरात राहत होतो आणि आज एका मोठ्या बंगल्यात राहत आहोत. जर काळजी घेतली नाही तर ह्या स्थित्यंतराच्या बरोबरीने आपल्या जाणिवांमध्येही बदल होईल. पूर्वी आपण विनम्र होतो पण आता अहंभाव डोकावू शकतो. जेवढं यश आपण आयुष्यात मिळवत जाऊ, कदाचित तेवढे आपण आपल्या मूळ गुणांपासून लांब जाऊ..

आपल्याला काही गोष्टी मिळवायच्या असतात. फक्त हे करत असताना आपले विचार आणि वर्तणूक मूळ गुणांबरोबर सुसंगत असायला हवी. उदाहरणार्थ- पैसा, नाव आणि प्रसिद्धी मिळवल्यानंतर हे सगळं मिळवलं तरीही मी एक आत्मा आहे, हे जर कोणी लक्षात ठेवलं तर त्याचे मूळ गुण जसेच्या तसेच राहतील. इतरांकडून काही मिळावं यासाठी त्याला झगडावं लागणार नाही आणि इतरांमुळे तो दुखावलाही जाणार नाही.

लहान मुलांना इतरांचा आदर करायला शिकवलं जातं. पण ह्याउलट, आपल्याला आदर मिळालाच पाहिजे असं मोठ्या माणसांना वाटतं. जसजसे आपण मोठे होत जाऊ, मोठ्या पदांवर जाऊ आणि आपली शैक्षणिक पात्रता वाढत जाईल तसतसं आपलं वागणं बदलतं.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, बाहेर पाऊस पडतोय,
छत्री घेऊन जा.
नवरा : अगं, पाऊस पडतोय माझ्यावर थोडीच पडतोय,
रस्त्यावर पडतोय!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ पेनिसिलिनचा शोध कोणी लावला?

- अलेक्झांडर फ्लेमिंग

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### घोसावळा

७) जुलाब होत असतील, तर घोसाळ्याच्या बिया पाच-दहा ग्रॅम घेऊन ताकामध्ये बारीक करून ते ताक प्यावे. यामुळे जुलाब थांबतात.

८) घोसाळ्याच्या ताज्या पानांचा दोन थेंब रस डोळे आले असल्यास डोळ्यांत घालावा. यामुळे डोळ्यांची उष्णता कमी होऊन आग थांबते.

९) घोसाळी, जास्वंद, ब्राह्मी, माका, वडाच्या पारंब्या घालून खोबरेल व तीळतेल उकळावे. यामधून तयार झालेले तेल केसांच्या मुळाशी लावल्यास केस पिकणे व गळणे थांबते.

१०) परिपक्व झालेल्या घोसाळ्याचा आतील रेषायुक्त जाळीदार भाग हा अंघोळीसाठी, तसेच भांडी घासण्यासाठी, सफाई करण्यासाठी वापरता येतो.

सावधानता : घोसाळी ही अग्निदीपक पाचक असल्याने सहसा शरद ऋतूत जास्त प्रमाणात खाऊ नयेत. कारण त्याच्या सेवनाने अधिकच पित्तप्रकोप होऊ शकतो.

दुधी भोपळा

दुधी भोपळ्यामध्ये दुधाइतकेच शरीरास आवश्यक असे पोषक घटक आहेत. म्हणूनच त्याचे नाव दुधी भोपळा पडले आहे. एक प्रकारे दुधी भोपळा हे वनस्पतिजन्य दूधच आहे. यथा नाम तथा गुण या उक्तीप्रमाणे दुधी भोपळ्याची तुलना आईच्या दुधाशी केली आहे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००





अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग व जागतिक सायकल डे निमित्त जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धेचे उद्घाटन सुमतीलाल कोठारी यांच्या हस्ते झेंडा दाखवून करण्यात आले.

# सायकलिंग या खेळामध्ये करिअर करण्याची संधी

## सुमतीलाल कोठारी यांचे प्रतिपादन; अहिल्यानगरमध्ये महिला सायकलपटूंचा थरार; स्पर्धेत २९६ खेळाडूंचा सहभाग

नगर – अहिल्यानगर जिल्ह्याला अस्मिता खेलो इंडिया स्पर्धेचा पहिला मान केंद्र सरकारने दिला आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देणे तसेच खेळाडूंना आंतरराष्ट्रीय सुविधा उपलब्ध करून प्रशिक्षण देणे. हा खेलो इंडियाचा मुख्य उद्देश आहे. सारडा महाविद्यालयाच्या वतीने खेळाडूंना नेहमीच सहकार्य केले जाते. सायकलिंग असोसिएशनच्या वतीने चांगल्या पद्धतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मुलींनी सायकलिंग या खेळाकडे वळावे. सायकलिंग या खेळामध्ये करिअर करावे. यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, असे प्रतिपादन सारडा कॉलेजच्या वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी यांनी केले आहे.

अहिल्यानगर येथील सारडा महाविद्यालयाच्या मैदानात राष्ट्रीय सायकलिंग महासंघ, खेलो इंडिया आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, सायकलिंग असोसिएशन ऑफ अहिल्यानगर, ईनिफिटी सायकलिंग ॲकॅडमी, जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर पोलिस मुख्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग व जागतिक सायकल डे निमित्त जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धेचे उद्घाटन सुमतीलाल कोठारी यांच्या हस्ते झेंडा दाखवून करण्यात आले. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा, प्राचार्या डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य गिरीश पाखरे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते निर्मल थोरात, ऑलम्पिक अ.नगर असोशियशनचे सचिव शैलेश गवळी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे विशाल गर्जे, सायकलिंग असोसिएशन महाराष्ट्राचे सचिव प्रा.संजय साठे, सायकलींग असो.अ.नगरचे अध्यक्ष साईनाथ थोरात, क्रीडा शिक्षक घनशाम सानप, कल्पेश भागवत, प्रा.संजय धोपावकर, प्रा.रावसाहेब बाबर, संभाजी मोहिते, अविनाश काळे, योगिता वाणी, विनायक भूतकर आदी उपस्थित होते.

पेमराज सारडा महाविद्यालय मैदानावर रविवारी सकाळी ६ वाजता स्लो झोन सुरूवात होऊन स्पर्धा पत्रकार चौक–डी एस पी चौक–स्टेट बँक चौक –चाँदनी चौक –सोलापुर चौक –टँक म्युझि;यम पासून सायकलिंग स्पर्धा सुरू झाली. पुढे स्पर्धा पुरूषांच्या सायकलिंग स्पर्धा पुढे वाळुंज पासून चाँदबिबी बायपास चौकातून परत टँकर मुझीयम पर्यंत शेवट करण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील नामांकित महिला सायकलपटू स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेत २९६ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यावेळी नगरकरांनी महिला सायकलपटचा थरार अनुभवला.

माहेश्वरी गावित म्हणाल्या, अस्मिता खेलो इंडिया या स्पर्धेचा उद्देश म्हणजे महिलांचे सक्षमीकरण करणे. हा आहे. या स्पर्धेत मुलींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला ही कौतुकास्पद बाब आहे. या स्पर्धेमुळे अहिल्यानगर मधील महिला खेळाडूंना प्रोत्साहन मिळाले आहे. सायकलिंग असोसिएशन ने उत्कृष्ट पद्धतीने या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

प्रास्ताविकात प्रा.संजय साठे म्हणाले, महिलांना सायकलिंग खेळात प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवोदित सायकलपटूंना राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी संधी मिळवून देण्यासाठी अस्मिता खेलो इंडिया उपक्रमांतर्गत ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात महिलांसाठी सायकलिंग स्पर्धा होत असल्यामुळे खेळाडूंसह क्रीडा प्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण होते. या स्पर्धेला सायकलिंग खेळाडूंनी चांगला प्रतिसाद दिला आहे. या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील नामांकित महिला सायकलपटू अहिल्यानगरमध्ये दाखल झाले होते.

या स्पर्धेचे मुख्य पंच म्हणून प्रा. संजय साठे, प्रा.साईनाथ थोरात, रावसाहेब बाबर, शैलेश गवळी, कल्पेश भागवत, घनश्याम सानप, विशाल गर्जे, अविनाश काळे, विनायक भुतकर, प्रा.संजय धोपावकर, दिनेश भालेराव, योगिता वाणी आदींनी परिक्षण केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले. साईनाथ थोरात यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## मना सत्यसंकल्प जीवी धरावा

"मुसाफिर"

संकलन: दिशान फिचर्स




मी सत्यवादी हरिश्चंद्र राजाची कथा ऐकतो. खूप प्रभावित होतो. सत्य बोलेन. सत्याशिवाय इतर काहीही बोलणार नाही, अशी शपथ घेतो. प्रसन्नता अनुभवतो. स्वतःला साधुसंतांच्या पंगतीत नेऊन बसवतो. आता मी जमिनीवर नसतो. खोटे बोलणाऱ्यांना लाख शिव्या मोजतो, पण दुसऱ्या दिवशी कामाला लागताच कथा विसरतो. खोट्याचे खरे करून हरिश्चंद्राचा नवा अवतार घेतो, पण ऋग्वेदाच्या ऋषीने सांगितलेला सोमदेवतेचा प्रभाव कुठे लक्षात घेतो? सोम ही यज्ञाशी संबद्ध अशी निसर्गातील शक्तिशाली देवता आहे.

जगात खोटं बोलण्याची स्पर्धा लागलीय. खरं तर सत्य केव्हाच मागं पडलंय. खऱ्याचा मार्ग काटेरी झुडपांनी व्यापलाय. खोट्याची पायवाट मात्र वर्दळीमुळे राजवाट झाली आहे. सत्याचा मार्ग सरळ आहे. पण म्हणूनच कंटाळवाणा आहे. खोट्याचा वळणदार वेडावाकडा मार्ग मात्र करमणूकवाणा आहे. त्या मार्गावरुन अदृश्य शक्ती खऱ्याला देते रक्षण आणि खोट्याला मात्र मरण।

मना, तुझा जाऊ देवू नकोस तोल. जे खरं असेल तेच बोल. अरे, खोट्याला काहीही नाही मोल. तुझ्या डोळ्यांची पट्टी खोल. खोट्याची साथ करणं फोल. वाईट गोष्टी करण टाळ, चांगल्या गोष्टी करण्याचे निर्णय पाळ. खोट्याला नष्ट करेल तो काळ.

अरे, खरे बोलायला कुठे कष्ट पडतात? काय त्यासाठी पैसे मोजावे लागतात? अरे, खोट्याचेच पाप टाळायला तन, मन आणि धन खर्ची पडतात. मन चिंतेत तन चितेत आणि धन खर्चेत. मग का रे बोलता खोटं? जे तुम्हाला दुःखात लोटे. खऱ्याचे मात्र सुख मनी दाटे. त्या सुखाची न तुलना कोठे.

पण खरे बोलायला धैर्य हवं. संस्कारानं ते प्राप्त व्हावं. मग जग सुधारावं. सर्वत्र सुख नांदावं. यापरते दुसरं काय मागावं?

एक होता राजा, त्याचा गलथान कारभार. प्रजा त्याच्यावर नाराज फार. मग त्यानं केली युक्ती. म्हणाला मी प्रजेला अमर करणार. अमृत शोधणार, पण प्रजा कसची बधते? मग त्यानं केली घोषणा. अमृताचा शोध लावला. अमृत तयार झालं. त्याच्या प्रधानानं त्याला अनुमोदन दिले. तेही सांगू लागले, की राजानं प्रजेला अमर करायला अमृत तयार केलं. तरीही प्रजा खूश होईना. ती म्हणाली, की देवदत्त नावाच्या प्रधानावर आमचा विश्वास. तो सत्यच बोलणार खास. मग राजानं देवदत्ताला बोलावलं. त्याच्यापुढे अमृत ठेवलं आणि त्याला दरडावून सांगितलं की, हे अमृत आहे असं सांग.

देवदत्तानं ते सांगायचे नाकारलं. मी खोटं बोलणार नाही, असं बजावलं. अमृत कुणीच तयार करू शकत नाही, हेच सत्य आहे. म्हणून तुम्ही भरलेल्या या प्याल्यात अमृत नाहीच. राजा रागावला. म्हणाला, हा प्याला प्राशन कर आणि हे अमृत आहे म्हणून सांग. नाहीतर मी तुला ठार करेन.

देवदत्त हसला. राजानं त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. खोटं बोलून प्रजेचं रक्षण करणारा राजा सगळ्यांचाच नाश करतो. हे अमृत नाही. तुम्ही सत्य वागत नाही. राजा आता संतप्त झाला. हो मग मरायला तयार म्हणाला.

देवदत्त पुन्हा हसला व म्हणाला, मी हे अमृत पितो. पण राजा, हे खरंच अमृत असेल, तर तू मला ठार करू शकणार नाहीस आणि हे पिऊनदेखील मी मेलो तर प्रजा समजेल ते अमृत नाही. तुझं खोटेपण प्रजेच्या ध्यानात येईल. प्रजा तुझा आणखी तिरस्कार करील. खोटारडा म्हणून निंदा करील.

राजा ते ऐकून भानावर आला. देवदत्ताच्या सत्य बोलण्यापुढे नमला. यापुढे प्रजेला नीट सांभाळेन म्हणाला.

– किशोर गांधी

# जागतिक सायकल दिनानिमित्त अहिल्यानगरात सायकलिंगचा जल्लोष

नगर – जागतिक सायकल दिनाचे औचित्य साधत सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने जिल्हा सायकलिंग असोसिएशन आणि इन्फिनिटी सायकलिंग अॅकॅडमी व बाईक टेक पॉईंट यांच्या संयुक्त विद्यमाने ७ जून रोजी राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धा उत्साहात पार पडली. यासोबतच महिलांसाठी विशेष असलेल्या 'अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग' देखील उत्साहात पार पडली. जिल्ह्यातील नामांकित महिला व पुरुष सायकलपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेत सायकलिंगचा रोमांचक अनुभव दिला. पेमराज सारडा महाविद्यालय मैदानापासून स्पर्धेला प्रारंभ झाला. महिलांना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये संधी मिळावी आणि सायकलिंग क्षेत्रात त्यांचे प्रोत्साहन वाढावे या उद्देशाने खेलो इंडिया अंतर्गत सलग दुसऱ्या वर्षी या लीगचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ६ वाजता सारडा महाविद्यालय मैदानावरून 'स्लो झोन'च्या माध्यमातून स्पर्धेला सुरुवात झाली. पत्रकार चौक, डीएसपी चौक, स्टेट बँक चौक, चांदणी चौक, सोलापूर चौक मार्गे टँक म्युझियमपर्यंत सायकलपटूंनी प्रवास केला. टँक म्युझियमपासून मुख्य स्पर्धेला सुरुवात झाली. पुरुषांची स्पर्धा वाळुंज, चांदबिबी बायपास चौक मार्गे पुन्हा टँक म्युझियम येथे समाप्त झाली.





स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी शिवछत्रपती पुरस्कार विजेते गणेश पवार, राष्ट्रीय पदकविजेते गौरव सिंह, राष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग प्रशिक्षक संकल्प थोरात, श्रीनिवास लोंढे, प्रा. साईनाथ थोरात, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव प्रा. संजय साठे, संभाजी मोहिते (कोच– इन्फिनिटी सायकलिंग अॅकॅडमी), लाला कांबळे, वैभव भोर, सागर करांडे, राष्ट्रीय पदकविजेते ओम करांडे, बाळासाहेब दीक्षित, वासुदेव पांढरे, अनिल भवर, अशोक गाडेकर, शिवनाथ मोहिते, सरपंच विष्णू थोरात, किरण बोयणे, पांडुरंग भोजने, विकास भालेराव, मोबिन शेख तसेच सिंहगड सायकलिंग फाउंडेशन (पुणे)चे नितीन थोपटे आदी उपस्थित होते.

विजेत्यांना रोख रक्कम, मेडल्स आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. महिलांसोबतच हौशी पुरुषांसाठी ४० किलोमीटर सायकल फन राईड, मेन्स ४० किलोमीटर स्पर्धा तसेच १८ वर्षांखालील मुलांसाठी २० किलोमीटर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेतील विजेत्यांसाठी एकूण ८० हजार रुपयांची रोख बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धेसाठी राष्ट्रीय सायकलिंग महासंघ, खेलो इंडिया आणि जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी अहिल्यानगर सायकलिंग असोसिएशन, सायकलिंग फेडरेशन ऑफ अहिल्यानगर तसेच राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय यश मिळविणाऱ्या सायकलपटूंचा सत्कार करण्यात आला. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी महाराष्ट्र पोलीस, शहर वाहतूक शाखा, जिल्हा रुग्णालय आणि पेमराज सारडा महाविद्यालय यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

स्पर्धेचे पंच म्हणून प्रा. संजय साठे, प्रा. कल्पेश भागवत, प्रा. शैलेश गवळी, प्रा. रावसाहेब बाबर, प्रा. साईनाथ थोरात, क्रीडा अधिकारी विशाल गर्जे, प्रा. अविनाश काळे, प्रा. संजय धोपावकर आणि प्रा. दिनेशल भालेराव यांनी काम पाहिले.

स्पर्धेतील विजेते – मास्टर गट (४० कि.मी.) प्रथम– खुद्दुस शेख, द्वितीय– रवी राजेश, तृतीय– हर्षल खांडवे, चतुर्थ – अकरम देवकाते, पाचवा– किरण पवार, सहावा– प्रविण पाटील.

मेन्स गट (४० कि.मी.) प्रथम– सुर्या थट्टू, द्वितीय– सिद्धेश पाटील, तृतीय– सुदर्शन देढगावकर, चौथा– रिहान शेख, पाचवा– अश्विनी मर्डेकर, सहावा उमेश बंजारा

१८ वर्षांखालील गट (२० कि.मी.)– प्रथम– मयंक पाखरे, द्वितीय– शुंभुराज यादव, तृतीय– आर्यन जाधव, चौथा– राजवर्धन शिंदे, पाचवा– शर्व वाळके

# 'जीवनज्योत स्कूल'मध्ये प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

नगर – बॉम्बे हॉस्पीटल बिल्डींगजवळ, फॉरेस्ट ऑफीस मागे, नगर औरंगाबादरोड, अ. नगर येथील जीवनज्योत इंग्लिश मीडीयम स्कलमध्ये प्रवेश प्रक्रीया सुरु झाल्याची माहीती प्राचार्य यांनी दिली.

प्ले ग्रुप, नर्सरी, एल.के.जी, यु.के. जी तसेच पहीली ते १० वी या वर्गासाठी प्रवेश देण्यात येत आहे. प्ले ग्रुप साठी दोन वर्षापर्यत, नर्सरीसाठी ३ वर्षापर्यत, एल के जी साठी ४ वर्ष, यु.के.जी साठी पाच वर्ष बालकांसाठी प्रवेश प्रक्रीया सुरु झाली आहे. व पहिली ते १० वी वर्गासाठी प्रवेश देण्यात येत आहे.

जीवनज्योत स्कुलमध्ये प्रशस्त क्लासरुम, अभ्यासाठी स्वच्छ व निरोगी वातावरण, शिकविण्याच्या नव्या पध्दती जसे ऑडीओ विजल ॲडस, इ लर्निंग पॅटर्न, ग्रंथालय, व खेळणी याव्दारे शिकविले जाते. तसेच कॉम्प्युटरचे प्रशिक्षण दिले जाते.

शिक्षणाच्या व्यतिरिक्त कला, खेळण्याचे वेगवेगळ्या सुविधा, हस्तकला, चित्रकला, यांचे प्रशिक्षण दिले जाते. खेळातुन मुलांना शिक्षणाची आवड निर्माण केली जाते. सहल आणि प्रदर्शन. अनुभवी व प्रशिक्षित शिक्षकवर्ग ही शाळेची वैशिष्टे. – नवीन शिक्षणपध्दतीव्दारे विद्यार्थ्यांना डेली लाईफ स्किल, एक्सप्रेशन, व्होकॅब्युलरी, म्युझिक यांच्यासारख्या शिक्षणामधुन विद्यार्थ्यांना क्रिएटीव्हीटी व कॉन्फिडन्स मिळते, त्याचप्रमाणे वाद्याचे प्रशिक्षण दिले जाते. वेळोवेळी आरोग्य तपासणी व प्रत्येक महिन्याचा विद्यार्थ्यांचा प्रोग्रेस रिपोर्ट, विद्यार्थ्यांची स्ट्रेंथ, विकनेस, मुल्यमापन, रिझल्ट पालकांना उपलब्ध करुन दिले जाते.

चांगल्या सवयी व सामाजिक कर्तृत्व शिकविल्या जातात. विद्यार्थ्यांना आहार विषयक व गुडहॅबिट सारख्या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी पालक मेळावा आयोजित केला जातो. सुरक्षेच्या दृष्टीने सी सी टी व्ही कॅमेरा व स्कुल व्हॅनची सुविधा उपलब्ध.

मागासवर्गीय, अनुसुचित जाती व जमाती व अल्पसंख्याक बालकांना शासन नियमाप्रमाणे पहीलीपासुन शिष्यवृत्ती दिली जाते.

जीवनज्योत इंग्लिश मीडीयम स्कूल यामध्ये प्रवेशासाठी पालकांना बॉम्बे हॉस्पीटल / बॉम्बे बेकरीजवळ, फॉरेस्ट ऑफीस मागे, नगर औरंगाबादरोड, अ. नगर येथे सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत संपर्क साधवा. संपर्क – ८८३०६८५७३२ / ८४४६६८८८६५

# भारतीय १७ वर्षांखालील ग्रीको-रोमन कुस्ती संघाला आशियाई अजिंक्यपद

## मुख्य प्रशिक्षक डॉ. पै. संतोष भुजबळ यांचा संभाजीराजे कुस्ती केंद्राच्या वतीने सत्कार



भारतीय १७ वर्षांखालील ग्रीको–रोमन कुस्ती संघाने आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत उल्लेखीनय कामगिरी केल्याबद्दल मुख्य प्रशिक्षक डॉ.पै. संतोष भुबळ यांचा संभाजीराजे कुस्ती केंद्र, पवननगर यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)


नगर – व्हिएतनाम येथे पार पडलेल्या १७ वर्षांखालील आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय ग्रीको–रोमन कुस्ती संघाने विविध वजनगटांत उल्लेखनीय कामगिरी करत रौप्य व कांस्य पदकांची कमाई केली आणि भारताला प्रतिष्ठेची संघ चॅम्पियनशिप मिळवून दिली. या ऐतिहासिक यशामध्ये भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे डॉ. पै. संतोष भुजबळ यांचा संभाजीराजे कुस्ती केंद्र, पवननगर यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कुस्ती केंद्राचे संस्थापक पैलवान शिवाजी चव्हाण, अध्यक्ष नितीन आव्हाड, अजित वाघ, संदीप गायकवाड, अतिश ठाकूर, यश टाकवाणे, प्रताप गायकवाड, युवराज चव्हाण, अमित गाडे, अविनाश मोरे यांच्यासह कुस्तीपटू, प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना मुख्य प्रशिक्षक डॉ. पै. संतोष भुजबळ म्हणाले की, जिद्द, चिकाटी आणि अथक मेहनतीच्या जोरावर कोणतेही यश संपादन करता येते. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित न राहता क्रीडा क्षेत्राकडेही गांभीर्याने पाहिले पाहिजे. आज क्रीडा क्षेत्रात करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. बालवयातच आपले ध्येय निश्चित करून त्यादृष्टीने सातत्याने प्रयत्न केल्यास मोठे यश मिळविता येते. ते पुढे म्हणाले की, व्हिएतनाम येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय कुस्तीपटूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विविध वजनगटांमध्ये पदकांची कमाई केली. या यशामुळे भारतीय कुस्तीची ताकद पुन्हा एकदा आशियाई स्तरावर अधोरेखित झाली आहे. अहिल्यानगरमधील संभाजी राजे कुस्ती केंद्रातील खेळाडूंनीही विविध शालेय, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होऊन उल्लेखनीय यश मिळवावे आणि राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचे नाव उज्वल करावे.

कार्यक्रमात उपस्थितांनी डॉ. संतोष भुजबळ यांच्या कार्याचा गौरव करत भारतीय कुस्ती क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले.

# अधिक मासानिमित्त स्वामी समर्थ मंदिरात विष्णुयाग सोहळा; सामूहिक सत्यनारायण पूजा उत्साहात

नगर – अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मासानिमित्त श्री गुरुचरित्र सत्संग परिवाराच्या वतीने सावेडी उपनगरात स्वामी समर्थ मंदिर, सावली सोसायटी, गुलमोहोर रोड येथे आयोजित करण्यात आलेला विष्णुयाग सोहळा रविवारी भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात उत्साहात झाला. या धार्मिक सोहळ्यास शहरातील तसेच परिसरातील असंख्य भाविक भक्तांनी उपस्थित राहून विविध धार्मिक विधींचा लाभ घेतला.





गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात अधिक मासानिमित्त विष्णू याग सोहळा व सामूहिक सत्यनारायण पूजा भक्तिमय वातावरण पार पडली (छाया – विजय मते)

हिंदू धर्मशास्त्रानुसार अधिक मास हा भगवान विष्णूंना समर्पित असून या महिन्यात केलेली उपासना, जप, तप, दानधर्म व धार्मिक विधी अनेक पटींनी फलदायी ठरतात. याच भावनेतून श्री गुरुचरित्र सत्संग परिवाराच्या वतीने या विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची गर्दी सुरू झाली होती.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ६ वाजता मंगल मंत्रोच्चार आणि गणेशपूजनाने करण्यात आली. त्यानंतर विधिवत विष्णुयाग संपन्न झाला. वेदपाठी ब्राह्मणांच्या मंत्रघोषात यज्ञकुंडात विविध आहुती अर्पण करण्यात आल्या. यज्ञाच्या वेळी उपस्थित भाविकांनी भगवान विष्णूंचा जयघोष करत वातावरण अधिकच मंगलमय केले.

यावेळी सामूहिक सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले. अनेक कुटुंबांनी या पूजेमध्ये सहभागी होत आपल्या कुटुंबाच्या सुख–समृद्धीसाठी प्रार्थना केली. या धार्मिक सोहळ्यात आ.संग्राम जगताप, नगरसेवक निखिल वारे, अमोल गाडे, अनिल बोरुडे, पुष्पा बोरुडे, किशोर डागवाले, आशा डागवाले, अभय आगरकर, डॉ.हर्षवर्धन तन्वीर आदींनी उपस्थित राहून समाधान व्यक्त केले. सत्यनारायण कथा श्रवणासाठीही भाविकांनी उपस्थिती दर्शविली. पूजेनंतर विष्णु सहस्रनाम पठणाचा कार्यक्रम पार पडला. शेकडो भाविकांनी सामूहिकरित्या विष्णु सहस्रनामाचे पठण करून भक्तीभाव व्यक्त केला. यावेळी मंदिर परिसर ॐ नमो भगवते वासुदेवाय या मंत्राने दुमदुमून गेला होता. तसेच भगवान विष्णूंना तुलसी व पुष्प अर्चन करण्यात आले. भाविकांनी भक्तिभावाने तुलसीदल अर्पण करून भगवान विष्णूंचे दर्शन घेतले.

कार्यक्रमाचे वेळी मंदिर परिसरात शिस्तबद्ध व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांच्या सोयीसाठी सकाळी अल्पोपहार, पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था तसेच महाप्रसादाचे नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे सर्व धार्मिक विधी सुरळीतपणे पार पडले. पौराहित्य श्रीधर होशिंग, मयूर कुलकर्णी, प्रवीण भालेराव, अनिल केसकर या गुरुजींनी केले.

या सोहळ्यास महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच बालकांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. दिवसभर भाविकांची दर्शनासाठी आणि पूजाविधीत सहभागी होण्यासाठी गर्दी कायम होती. अनेकांनी कुटुंबासह उपस्थित राहून धार्मिक वातावरणाचा लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री गुरुचरित्र सत्संग परिवारातील कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले तर स्वयंसेवकांनी नियोजन, व्यवस्थापन आणि भाविकांच्या सेवेसाठी मोठे योगदान दिले. कार्यक्रमाच्या शेवटी महाआरती आणि महाप्रसाद वाटप करण्यात आला. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा विष्णुयाग सोहळा व सामूहिक सत्यनारायण महापूजा यामुळे भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिकतेचा संगम ठरला. असंख्य भाविकांच्या उपस्थितीमुळे आणि उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या झाला असून अहिल्यानगरच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनात या सोहळ्याने विशेष स्थान निर्माण केले आहे.

# उज्जैन येथे महाकाल सेनेचा स्थापना दिवस उत्साहात; योगी बुद्धनाथ अवघड पीर यांची राष्ट्रीय प्रवक्तेपदी नियुक्ती


योगी बुद्धनाथ अवघड पीर यांची राष्ट्रीय प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली.

नगर – महाकालाची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उज्जैन येथे श्री महाकाल सेना सेवा संस्थानचा स्थापना दिवस ६ जून रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील संत-महंत, पदाधिकारी, भाविक आणि महाकाल भक्तांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात संस्थेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

स्थापना दिनाच्या विशेष कार्यक्रमात राष्ट्रीय महाकाल सेनेच्या २३ राज्यांतील नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील अहिल्यानगर येथील योगी बुद्धनाथ अवघड पीर (गुरु तपस्वी योगी बाबा बम बम नाथजी) यांची राष्ट्रीय महाकाल सेनेच्या राष्ट्रीय प्रवक्ते पदी नियुक्ती करण्यात आली.

राष्ट्रीय अध्यक्ष योगी रोहतास नाथजी महाराज यांच्या हस्ते योगी बुद्धनाथ अवघड पीर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक दिगंबर श्री श्री १००८ खुशाल भारतीजी महाराज, राष्ट्रीय सचिव राहुल गिरीजी महाराज यांच्यासह विविध राज्यांतील पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना राष्ट्रीय अध्यक्ष योगी रोहतास नाथजी महाराज यांनी महाकाल सेनेच्या माध्यमातून सामाजिक, धार्मिक आणि राष्ट्रहिताच्या कार्याला अधिक गती देण्याचे आवाहन केले. संघटनेच्या ध्येय-धोरणांचा प्रचार व प्रसार करताना समाजातील सर्व घटकांपर्यंत सेवा कार्य पोहोचविण्याची जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पार पाडावी, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय प्रवक्ते पदी निवड झाल्याबद्दल योगी बुद्धनाथ अवघड पीर यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे. महाकाल सेनेच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी आणि संघटनेची भूमिका जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# सोनी गिफ्टमध्ये प्रीमियम आणि युनिक घड्याळांचे लॉन्चिंग

## घरसजावटीपासून प्रीमियम लाईफस्टाईलपर्यंत सर्व काही एका छताखाली; उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते शुभारंभ


सोनी गिफ्ट दालनामध्ये ग्राहकांसाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्यांच्या प्रीमियम आणि युनिक घड्याळांच्या विशेष कलेक्शनचा शुभारंभ करताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया. (छाया – लहू दळवी)

नगर – प्रोफेसर कॉलनी चौक परिसरातील सोनी गिफ्ट फ्रँचायसी बाय डीबी व्हेंचर्स हे दालन अल्पावधीतच ग्राहकांच्या पसंतीचे आणि आकर्षणाचे केंद्र बनले असून, घरसजावटीच्या आकर्षक वस्तू, नामांकित ब्रँड्सची उत्पादने आणि आधुनिक लाईफस्टाईलशी निगडित वस्तूंसाठी ओळख निर्माण केली आहे. आता या दालनामध्ये ग्राहकांसाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्यांच्या प्रीमियम आणि युनिक घड्याळांच्या विशेष कलेक्शनचे आगमन झाले असून त्याचा शुभारंभ उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाला. यावेळी जयराम डोडेजा, प्रकाश डोडेजा, साहिल डोडेजा, ईशा डोडेजा, नेहा डोडेजा यांच्यासह ग्राहक उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी बोलताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया म्हणाले की, सोनी गिफ्टने नेहमीच ग्राहकांना दर्जेदार, विश्वासार्ह आणि आधुनिक वस्तू उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच या दालनाने अल्पावधीत ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. घरसजावटीच्या आकर्षक वस्तूंपासून ते विविध नामांकित कंपन्यांच्या ब्रँडेड उत्पादनांपर्यंत अनेक पर्याय येथे उपलब्ध आहेत. आता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रीमियम घड्याळे उपलब्ध झाल्यामुळे नगरकरांना महानगरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. ते पुढे म्हणाले की, आजच्या काळात घड्याळ हे केवळ वेळ दाखविण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्वाची ओळख बनले आहे. दर्जा, शैली आणि वेगळेपण जपणाऱ्या ग्राहकांसाठी सोनी गिफ्टने आणलेले हे कलेक्शन निश्चितच आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

अहिल्यानगरकरांसाठी आणखी एक आनंदाची बाब म्हणजे सोनी गिफ्ट्स मध्ये आता जगप्रसिद्ध ब्रिटाइम लंडन या ब्रँडचे आकर्षक आणि प्रीमियम घड्याळांचे कलेक्शन उपलब्ध झाले आहे. पारंपरिक ब्रिटीश हॉरॉलॉजी आणि आधुनिक इंजिनियरिंग यांचा अप्रतिम संगम या घड्याळांमध्ये पाहायला मिळतो. या घड्याळांमधील ऑटोमॅटिक मेकॅनिकल मुव्हमेंट हे विशेष आकर्षण असून त्यासाठी बॅटरीची आवश्यकता नसते. मनगटाच्या नैसर्गिक हालचालींवर चालणारे हे अत्याधुनिक तंत्रज्ञान घड्याळप्रेमींना वेगळा अनुभव देते. तसेच सिग्नेचर स्केलेटन डायल हे या कलेक्शनचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. घड्याळाच्या आतल्या सुंदर आणि जटिल यांत्रिक रचनेची झलक या डायलमधून पाहायला मिळते, ज्यामुळे प्रत्येक घड्याळ अधिक आकर्षक आणि वैशिष्ट्यपूर्ण बनते. प्रिमियम स्टॅनलेस स्टील कंस्ट्रक्शन, उत्कृष्ट दर्जा, आकर्षक फिनिशिंग आणि जागतिक स्तरावरील क्राफ्टसमानशिप मुळे ब्रिटाईम लंडन चे प्रत्येक घड्याळ हे केवळ ॲक्सेसरी नसून एक स्टाईल स्टेटमेंट ठरते.

सोनी गिफ्टमध्ये उपलब्ध असलेले हे नवीन कलेक्शन ग्राहकांना क्लास, एलिगन्स आणि वेगळेपणाचा अनुभव देणारे ठरत आहे. आधुनिक फॅशन, व्यवसायिक व्यक्तिमत्त्व, विशेष भेटवस्तू किंवा वैयक्तिक संग्रहासाठी ही घड्याळे उत्तम पर्याय मानली जात आहेत. दर्जेदार उत्पादने, आकर्षक मांडणी, ग्राहकाभिमुख सेवा आणि सातत्याने नवीन संकल्पना आणण्याच्या प्रयत्नांमुळे सोनी गिफ्ट्स, अहिल्यानगर हे केवळ गिफ्ट शॉप न राहता प्रीमियम लाईफस्टाईल अनुभवाचे केंद्र बनत आहे. अहिल्यानगरकरांनो, जर तुम्हाला प्रीमियम, युनिक आणि जागतिक दर्जाच्या घड्याळांची आवड असेल, तर सोनी गिफ्ट्स मध्ये उपलब्ध झालेल्या ब्रिटाईम लंडन च्या विशेष कलेक्शनला अवश्य भेट द्या.

# ज्येष्ठ महिलांनी तयार करावी 'उर्वरित आयुष्याची बकेट लिस्ट'

## डॉ. श्यामा मंत्री यांचे प्रतिपादन; निरोगी, आनंदी आणि अर्थपूर्ण जीवनासाठी व्याख्यान; प्रयास नम्रता दादी-नानी ग्रुपचा उपक्रम


'उर्वरित आयुष्याची बकेट लिस्ट' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. श्यामा मंत्री.

नगर – ज्येष्ठ महिलांचे आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि आनंदी जीवनशैली यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने प्रयास नम्रता दादी-नानी ग्रुपच्या वतीने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. ज्येष्ठ महिलांमध्ये वाढत्या वयाबरोबर निर्माण होणारे विविध आरोग्यविषयक प्रश्न, मानसिक तणाव आणि भावनिक आव्हाने याबाबत जागृती घडवून आणण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात महिलांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. श्यामा मंत्री उपस्थित होत्या. त्यांनी 'उर्वरित आयुष्याची बकेट लिस्ट' या विषयावर अत्यंत प्रेरणादायी आणि जीवनाला नवी दिशा देणारे मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून नगरसेविका रूपाली निखिल वारे, राजस्थानी महिला मंडळाच्या सल्लागार पुष्पा मणियार, सरस्वती झंवर, दादी-नानीच्या उपाध्यक्षा सुचेता बोरकर, लता आंबेकर, दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, प्रयास ग्रुपच्या अध्यक्ष रजनी भंडारी, संस्थापक अध्यक्ष अलकाताई मुंदडा, सचिव हिरा शहापुरे, खजिनदार मेघना मुनोत, ॲड. स्वाती जाधव, सुपर्णा देशमुख, वैशाली क्षीरसागर, उषा सोनी, छाया भंडारी, अरुणा गोयल, कविता शिंगवी, ॲड. ज्योत्स्ना कुलकर्णी, सुजाता कदम, अलका वाघ, सुनिता काळे, सोनाली थोरात, सुरेखा जंगम, हेमा पडोळे, नीलिमा पवार, उषा सोनटक्के, शशिकला झरेकर, जयश्री पुरोहित, सोनी पुरनाळे, लीला अग्रवाल, रेखा फिरोदिया, आशा गायकवाड आदी उपस्थित होत्या.

मार्गदर्शन करताना डॉ. श्यामा मंत्री म्हणाल्या की, प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात वेळ ही सर्वात मौल्यवान संपत्ती आहे. एकदा निघून गेलेला वेळ परत मिळत नाही. त्यामुळे आयुष्याच्या उत्तरार्धात किंवा निवृत्तीनंतर वेळ कसा घालवायचा याचा सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे. अनेक महिला आयुष्यभर कुटुंब, मुलं, नोकरी, व्यवसाय आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळण्यात व्यस्त असतात. मात्र, आयुष्याच्या या टप्प्यावर स्वतःसाठी जगण्याची, स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्याची आणि आनंद शोधण्याची गरज आहे. त्या पुढे म्हणाल्या की, प्रत्येक ज्येष्ठ महिलेने स्वतःची 'बकेट लिस्ट' तयार करावी. आयुष्यात करायच्या राहिलेल्या गोष्टी, पूर्ण करायची स्वप्ने, शिकायची कला, भेट द्यायची ठिकाणे, समाजासाठी करायची कामे आणि स्वतःच्या आनंदासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींची यादी तयार करून त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यामुळे आयुष्याबद्दल सकारात्मकता निर्माण होते आणि जगण्याची उमेद कायम राहते.

डॉ. मंत्री यांनी ज्येष्ठ महिलांच्या आरोग्याविषयी बोलताना सांगितले की, वाढत्या वयात केवळ शारीरिक आरोग्य चांगले असणे पुरेसे नाही, तर मानसिक आणि भावनिक स्वास्थ्यही तितकेच महत्त्वाचे आहे. नियमित व्यायाम, चालणे, संतुलित आहार, पुरेशी झोप आणि आरोग्य तपासणी यामुळे शरीर तंदुरुस्त राहते. परंतु मन आनंदी व स्थिर राहण्यासाठी सकारात्मक विचार, छंद जोपासणे, मित्रपरिवाराशी संवाद ठेवणे आणि समाजात सक्रिय राहणे गरजेचे आहे. त्या म्हणाल्या की, अनेक वेळा एकटेपणा, अपेक्षाभंग, कौटुंबिक बदल किंवा आरोग्याच्या समस्या यामुळे ज्येष्ठ नागरिक भावनिकदृष्ट्या खचून जातात. अशा परिस्थितीत स्वतःला सावरणे आणि भावनिकदृष्ट्या सक्षम बनविणे आवश्यक आहे. जीवनात समस्या येणारच, मात्र त्यांच्याकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिल्यास त्यावर सहज मात करता येते. भावनांचा योग्य ठिकाणी आणि विचारपूर्वक वापर केल्यास नातेसंबंध अधिक दृढ होतात आणि म ानसिक तणाव कमी होत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जयाताई गायकवाड यांनी दादी-नानी ग्रुपच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून महिला सक्षमीकरण, आरोग्य जनजागृती, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

पाहुण्यांचे स्वागत अलकाताई मुंदडा यांनी केले.

कार्यक्रमात महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक तसेच बौद्धिक खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्या महिलांचा गौरव करून त्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

सूत्रसंचालन गौरी जोशी यांनी केले. ॲड. स्वाती जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उज्वला मालू आणि दीपा सोनी यांनी परिश्रम घेतले.

# डॉ.एन.जे पाऊलबुधे फार्मसी कॉलेजचा दशवार्षिक सोहळा वृक्षारोपणाने साजरा



डॉ.पाऊलबुधे फार्मसी कॉलेजचा दशवार्षिक सोहळा १० वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. (छाया – विजय मते)

नगर – वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ.एन.जे. पाऊलबुधे फार्मसी कॉलेज मध्ये जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून डॉ.पाऊलबुधे कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या दशवार्षिक (२०१६-२०२६) सोहळ्याच्या शुभारंभा निमित्त महाविद्यालय या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व फार्माकोग्नोसी विभागाच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे दहा वर्षांच्या यशस्वी शैक्षणिक प्रवासाचे प्रतीक म्हणून १० वृक्षांचे रोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतानाच संस्थेच्या प्रगतीचा गौरव करणारा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकुल, खजिनदार दादासाहेब भोईटे उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेताना सांगण्यात आले की, महाविद्यालयाची सुरुवात सन २०१६ मध्ये डी.फार्म. अभ्यासक्रमाने झाली. त्यानंतर २०१७ मध्ये बी.फार्म. अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. संस्थेने सातत्याने शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात प्रगती करत सन २०२४ मध्ये एम.फार्म. (फार्मास्युटिकल केमिस्ट्री, फार्मास्युटिक्स व फार्माकोलॉजी) हे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करून आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. अल्पावधीतच संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून फार्मसी शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

कार्यक्रमास बी.फार्म. प्राचार्य डॉ. श्याम पंगा, डी.फार्म. प्राचार्या डॉ. अनुराधा चव्हाण, विभागप्रमुख डॉ.वेणू कोला, डॉ. रोशनी सूर्यवंशी, डॉ. प्रसाद घुगरकर, डॉ.विजय तारडे, प्रा. स्वाती कडनोर, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची शपथ घेतली.

महाविद्यालयाच्या दशवार्षिक वर्षाच्या प्रारंभी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.


स्वामी सद्गुरु हायटेक नर्सरीचा शुभारंभ करताना आयुर्वेद शास्त्र शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप. समवेत आ. संग्राम जगताप, गणेश भोसले, संपत बारस्कर, मोहन गुंजाळ आदी.

# स्वामी सद्गुरु हायटेक नर्सरीचा शुभारंभ

नगर – विविध देशी वृक्ष, आंबा, जांभूळ, सीताफळ, चिकू, नारळ यांसारखी फळझाडे, आकर्षक फुलझाडे तसेच पर्यावरणपूरक रोपांचा समावेश असलेल्या स्वामी सद्गुरु हायटेक नर्सरीचा शुभारंभ आयुर्वेद चौक, अमरधाम रोड येथे आयुर्वेद शास्त्र शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

सचिन जगताप म्हणाले, आजच्या घडीला शहरांमध्ये हरित क्षेत्राचे प्रमाण झपाट्याने कमी होत आहे. वाढते नागरीकरण, काँक्रीटीकरण आणि पर्यावरणातील बदल यामुळे वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधिक वाढले आहे. अशा परिस्थितीत नागरिकांना वृक्षांचे महत्त्व समजून देण्यासाठी आणि वृक्षारोपणाची आवड निर्माण करण्यासाठी आधुनिक सुविधांनी युक्त हायटेक नर्सरीची आवश्यकता आहे. या नर्सरीमध्ये सर्व प्रकारची फळझाडे, देशी वृक्ष, फुलझाडे तसेच पर्यावरणपूरक विविध रोपे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामुळे नागरिकांना केवळ रोपे खरेदीच करता येणार नाहीत, तर निसर्गाचा आनंद घेत पर्यावरण संवर्धनाची प्रेरणाही मिळणार आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप, गणेश भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नर्सरीचे संचालक मोहन गुंजाळ, दिलीप उरमोडे, गौरव उरमोडे, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक कुमारसिंग वाकळे, सुरेश बनसोडे, मनोज कोतकर, दत्ता गाडळकर, बाली बांगरे, संभाजी पवार, पैलवान बंटी गुंजाळ, अनिल गुंजाळ, अनिल मुरकुटे, गणेश गोंडाळ, भरत पवार, केशव चेमटे, सचिन गुंजाळ, पांडुरंग गुंजाळ, सुनील गुंजाळ, उद्धव गुंजाळ, विशाल नगरे, अमित तवले उपस्थित होते.

कार्यक्रमात आमदार संग्राम जगताप यांनी उपस्थितांना जागतिक पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा देत वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला. ते म्हणाले की, वाढत्या तापमानावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि भावी पिढ्यांना स्वच्छ व निरोगी पर्यावरण देण्यासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करणे आवश्यक आहे. स्वच्छ, सुंदर आणि हरित अहिल्यानगर घडविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा. स्वामी सद्गुरु हायटेक नर्सरीच्या माध्यमातून नगरकरांना विविध जातींची झाडे, फळझाडे आणि शोभिवंत रोपे सहज उपलब्ध होणार असून पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला निश्चितच बळ मिळणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी बीड ते मंत्रालय लाँग मार्च; १५ जून रोजी नगरमध्ये आगमन

## नियोजन बैठकीत हजारो भीमसैनिकांच्या सहभागाचा निर्धार


अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या प्रमुख मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या लाँग मार्चच्या यशस्वी नियोजनासाठी तारकपूर बसस्थानक परिसरातील व्ही स्टार येथे बैठक झाली.

नगर – अनुसूचित जातीतील उपवर्गीकरण रद्द करण्याच्या प्रमुख मागणीसाठी बीड ते मंत्रालय, मुंबई दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या लाँग मार्चच्या यशस्वी नियोजनासाठी तारकपूर बसस्थानक परिसरातील व्ही स्टार येथे बैठक झाली. या बैठकीस लाँग मार्चचे प्रमुख संयोजक सिद्धार्थ शिनगारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी निवृत्ती आरू होते. यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, अशोक गायकवाड, सुमेध गायकवाड, परिमल निकम, विजयराव भांबल, संजय खामकर, एन. एम. पवळे, शिवाजी साळवे, अमित काळे, विलास साठे, राजू उभाले, प्रा. जयंत गायकवाड, महेश भोसले, कौशल गायकवाड, विशाल कांबळे, विशाल भिंगारदिवे, विशाल गायकवाड, प्रा डि आर जाधव, सागर ठोकळ, सचिन शेलार, शरद मेढे, प्रा एल बी जाधव, सिद्धार्थ आढाव, समीर भिंगारदिवे, सृजन भिंगारदिवे, दिपक अमृत, शिवाजी भोसले, छानराज क्षेत्रे, मयूर पाखरे, अजय पाखरे, दया गजभिये, पंकज लोखंडे, जयश्री गायकवाड, हनुमंत गायकवाड, वैभव जाधव, संकेत गव्हाले, श्रेयस भिंगारदिवे, सनी भाकरे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक विलास साठे यांनी केले.

बैठकीत माहिती देताना सांगण्यात आले की, १० जून रोजी बीड येथून लाँग मार्चला प्रारंभ होणार असून १५ जून रोजी हा मार्च अहिल्यानगर शहरात दाखल होईल. त्यानंतर विविध जिल्ह्यांतून मार्गक्रमण करत २६ जूनला मंत्रालय, मुंबई येथे धडक देण्यात येणार आहे.

यावेळी बोलताना नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, समाजहिताला आम्ही नेहमीच प्रथम प्राधान्य देणार आहोत. समाजाच्या प्रश्नांवर संघर्ष करताना कोणताही दबाव आला तरी पदाचा त्याग करण्यासही आम्ही मागेपुढे पाहणार नाही. लाँग मार्चमध्ये सहभागी होणाऱ्या भीमसैनिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी सर्व आवश्यक व्यवस्था उत्कृष्टपणे करण्यात येतील. तसेच अहिल्यानगर शहरातून भीमसैनिक या मार्चमध्ये सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर म्हणाले की, सुरेश बनसोडे यांनी घेतलेले प्रत्येक सामाजिक उपक्रम यशस्वी झाले आहेत. त्यामुळे या लाँग मार्चचे नियोजनही त्यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी होईल. चर्मकार समाज गावोगावी जाऊन जनजागृती करत असून चर्मकार समाजबांधव या आंदोलनात सहभागी होणार आहेत. अहिल्यानगर, पुणे आणि मुंबई परिसरातील चर्मकार समाज उपवर्गीकरणाच्या विरोधात एकजुटीने उभा राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

लाँग मार्चचे प्रमुख संयोजक सिद्धार्थ शिनगारे यांनी राज्य सरकारच्या आरक्षण धोरणावर टीका करताना सांगितले की, अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणाचा मुद्दा पुढे करून विविध समाजघटकांमध्ये मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. समाजातील मूलभूत प्रश्नांपासून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी जाती-धर्मांमध्ये संघर्ष निर्माण करण्याचे कारस्थान राबविले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. ते पुढे म्हणाले की, अनुसूचित जातींमधील बहुतांश जाती उपवर्गीकरणाच्या विरोधात आहेत. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निर्णयानंतर राज्य शासनाने अनंत बदर आयोगाच्या अहवालाच्या आधारे उपवर्गीकरणाची प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४१ नुसार अनुसूचित जातींशी संबंधित अधिकार राष्ट्रपती आणि संसदेला असल्याने हा निर्णय घटनाबाह्य असल्याचा दावा त्यांनी केला.

या मार्चद्वारे शासनाकडे काही प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत. त्यामध्ये अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबविणे, अनंत बंदर आयोगाचा अहवाल सार्वजनिक करणे, जातनिहाय जनगणना करणे, अनुसूचित जातींसाठी रिक्त असलेल्या सुमारे ४० टक्के अनुशेष जागा तातडीने भरणे आणि पदोन्नतीतील आरक्षण कायम ठेवणे या मागण्यांचा समावेश आहे. या लाँग मार्चमध्ये राज्यभरातून हजारो नागरिक आणि भीमसैनिक सहभागी होणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.


# दहावी/बारावीनंतर काय? विषयावर 'फ्रि करिअर कौन्सिलींग'चे आयोजन

नगर– दहावीची / बारावीची परिक्षा दिलेल्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना भविष्यात यशस्वी होण्यासाठी कोणते क्षेत्र निवडावे हा प्रश्न भेडसावत आहे तसेच ज्या विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी / पदवीमध्ये कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा हे ठरलेले आहे, त्यांना देखील त्या शाखेतील विविध संधीची परिपुर्ण माहिती नाही, बऱ्याच शाळा / महाविद्यालय किंवा सामाजिक संस्था याविषयी व्याख्याने आयोजित करतात व त्यातुन उत्तम माहितीही सांगितली जाते. दहावी/बारावी नंतर तुम्ही कोणती 'शाखा निवडता व कुठे शिकता यावर बरेच अवलंबुन असते. या संदर्भातील तज्ञांच्या प्रत्यक्ष भेटीत विद्यार्थी व पालकांचे संपुर्ण शंका निरसन झाल्यास यशस्वीतेच्या दृष्टीने कुठे प्रवेश घ्यायचा हे ठरविणे सोपे जाईल.

जिवन ज्योत मेडिकल फोंडेशनचे जिवन ज्योत ज्युनिअर कॉलेज व बॉम्बे इन्स्टिटयूट ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना याबाबतचे वैयक्तिक मार्गदर्शन मिळण्याची संधी उपलब्ध करुन देत आहोत. जिवन ज्योत मेडिकल फोंडेशनने आजपर्यंत अनेक विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती बरोबर ज्ञान देवून घडविलेले आहे. १९९४ पासुन जिवनज्योत मेडिकल फौंडेशन अंतर्गत अनेक विद्यार्थी मेडिकल लॅब टेक्नीशियन, रेडीओलॉजी टेक्निशियन (एक्स रे, इ.सी.जी, सी.टी स्कॅन, एम आर. आय, सोनोग्राफी, कॅथलॅब, डायलॅसिस), फिजीओथेरापी, नर्सिंग व ऑपरेशन थिएटर असिस./ टेक्निशियन, कॉम्प्युटर टेक., बांधकाम पर्यवेक्षक (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक) झाले आहेत.

जिवन ज्योत ज्युनिअर कॉलेज व बॉम्बे इन्स्टिटयूट ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग यांचे अंतर्गत अनेक विद्यार्थी पॅरामेडिकल, व्यावसायिक व तांत्रिक कोर्सेस करुन आपले भविष्य उज्वल केलेले आहे. पॅरामेडिकलमध्ये डि.एम.एल.टी, रेडीओलॉजी (एक्स रे, इ.सी.जी, सी.टी स्कॅन, एम आर.आय, सोनोग्राफी, कॅथलॅब, डायलॅसिस), फिजीओथेरापी, नर्सिंग व ऑपरेशन थिएटर टेक्निशिअन अभ्यासक्रम व व्यावसायिक मध्ये बांधकाम पर्यवेक्षक (स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक) व तांत्रिकमध्ये कॉम्प्युटर टेक्निकल, इ. विषयांचा अभ्यास व अनुभव दांडगा आहे. याचा फायदा विद्यार्थ्यांना व्हावा या दृष्टीने नगरकरांनाही संधी मिळत आहे. विद्यार्थी अथवा पालक खाली दिलेल्या नंबरवर कॉल करु शकता किंवा जिवन ज्योत मेडिकल फोंडेशनचे जिवन ज्योत ज्युनिअर कॉलेज व बॉम्बे इन्स्टिटयूट ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग, बॉम्बे हॉस्पीटल / बॉम्बे बेकर्स समोर, वनविभाग ऑफीस मागे, नगर औरंगाबाद रोड, अहमदनगरमध्ये ८ ते १३ जून सकाळी ११ ते दुपारी २ च्या दरम्यान येवुन प्रत्यक्ष भेटीत माहिती मिळवू शकता. विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घ्यावा व आपल्या पाल्याचे भविष्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळवावे. माहितीसाठी मो. नं. ८८३०६८५७३२ किंवा ९३७३५६०४५२ या नंबरवर संपर्क साधावा.

# अर्थजगत



## गोल्ड-टू-सिल्व्हर रेशो का महत्त्वाचा?

**सोने आणि चांदीच्या किमतींमधील परस्पर संबंध समजून घेण्यासाठी गोल्ड-टू-सिल्व्हर रेशो (सोने-चांदी गुणोत्तर) हे एक महत्त्वाचे परिमाण मानले जाते. १ औंस सोन्याच्या बदल्यात किती औंस चांदी खरेदी करता येऊ शकते, हे या गुणोत्तरावरून स्पष्ट होते. या गुणोत्तराची गणना सोन्याच्या प्रति औंस किमतीला चांदीच्या प्रति औंस किमतीने भागून केली जाते, ज्यामध्ये दोन्ही धातूंचे मूल्य ट्रॉय औंसमध्ये मोजले जाते.**

रोमन साम्राज्यात हे गुणोत्तर १२:१ असे निश्चित करण्यात आले होते, तर अमेरिकेने १७९२ च्या नाणेनिधी कायद्यानुसार ते १५:१ असे निश्चित केले होते. जागतिक अर्थव्यवस्थांनी सुवर्ण प्रमाण पद्धतीचा (गोल्ड स्टँडर्ड) त्याग केल्यानंतर हे गुणोत्तर पूर्णपणे बाजारपेठेतील पुरवठा, औद्योगिक मागणी आणि गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर अवलंबून राहिले आहे. यामुळेच १९८० मध्ये हे गुणोत्तर १७:१ वर आले होते, तर २०२० मधील कोरोनाच्या काळात जागतिक भीतीमुळे सोन्याची खरेदी वाढल्याने ते १२ :१ या ऐतिहासिक पातळीवर पोहोचले होते.

चालू वर्ष म्हणजेच २०२६ च्या सुरुवातीला हे गुणोत्तर साधारणपणे ६०:१ ते ७५:१ या दरम्यान स्थिरावले असून ते त्याच्या ऐतिहासिक सरासरीच्या जवळ आहे. गुंतवणूकदारांसाठी हे गुणोत्तर बाजारातील चढ-उतारांचे संकेत देणारे एक महत्त्वपूर्ण साधन ठरते. जेव्हा हे गुणोत्तर खूप वाढते, म्हणजेच ८० च्या पार जाते, तेव्हा सोन्याच्या तुलनेत चांदीचे मूल्य कमी (अंडरव्हॅल्यूड) असल्याचे मानले जाते. यामुळे गुंतवणूकदार चांदीकडे आकर्षित होतात. याउलट, जेव्हा हे गुणोत्तर ५० च्या नीचे घसरते, तेव्हा चांदीच्या तुलनेत सोने अधिक फायदेशीर वाटू लागते.


आर्थिक अनिश्चितता किंवा संकटकाळात गुंतवणूकदार सुरक्षित पर्याय म्हणून सोन्याकडे वळतात. यामुळे हे गुणोत्तर वाढते. मात्र, जेव्हा आर्थिक प्रगती होते आणि सौर ऊर्जा, इलेक्ट्रॉनिक वाहने तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) डेटा सेंटर्समधून चांदीची औद्योगिक मागणी वाढते, तेव्हा चांदी सोन्यापेक्षा अधिक चांगली कामगिरी करते आणि हे गुणोत्तर खाली येते.

जरी हे गुणोत्तर अत्यंत उपयुक्त असले, तरी त्याच्या काही मर्यादा देखील आहेत. हे गुणोत्तर केवळ सापेक्ष मूल्य दर्शवते, परंतु बाजारातील प्रत्यक्ष किमती स्वस्त आहेत की महाग, हे यावरून स्पष्ट

### ■ अर्थसल्ला

होत नाही. तसेच हे गुणोत्तर भूतकाळातील सरासरी पातळीवर पुन्हा येईलच असे बंधन नसते, ते दीर्घकाळ उच्च किंवा नीचांकी पातळीवर राहू शकते.

भारतीय बाजारपेठेचा विचार करता, मल्टि कमोडिटी एक्सचेंजवर (एमसीएक्स) देखील हे गुणोत्तर जागतिक बाजाराच्या गतीनेच चालते (सध्या जागतिक पातळीवरील ६०:१ च्या तुलनेत भारतात हे ५७:१ च्या आसपास आहे), त्यामुळे भारतीय गुंतवणूकदारांना मौल्यवान धातूंमध्ये मालमत्ता वाटप (एसेट अलोकेशन) करताना आणि योग्य वेळी गुंतवणूक बदलताना याचा मोठा फायदा होतो.



## एक टक्क्याचा नियम काय आहे?

एक टक्का नियम हा जीवनशैलीत कोणताही मोठा किंवा जाचक बदल न करता बचतीमध्ये किरकोळ आणि सोप्या सुधारणा करण्यावर भर देतो. हा नियम तुमच्या बदलत्या किंवा ऐच्छिक खर्चांवर लागू होतो. याची अंमलबजावणी करण्यासाठी तुमचे ऐच्छिक खर्च (हॉटेलिंग, ऑनलाईन शॉपिंग, करमणूक) वेगळे करा.

१. असे ऐच्छिक खर्च महिना १५,००० रुपये असतील, तर त्याच्या १ टक्के म्हणजे १५० रुपये इतके छोटे लक्ष्य निश्चित करा. यासाठी एक न वापरलेले सबस्क्रिप्शन बंद करणे किंवा आठवड्यातून एकदा कॅब शेअर करणे यासारखा छोटा बदल करा. ही वाचलेली १५० रुपयांची रक्कम ताबडतोब तुमच्या एसआयपी किंवा बचत खात्यात वळवा. पुढील महिन्यात याच प्रक्रियेची पुनरावृत्ती करा.

२. पहिल्या महिन्यात खर्च १४,८५० रुपयांवर येतो आणि १५० रुपये वाचतात. दुसऱ्या महिन्यात पुन्हा १ टक्के कपात केल्यास खर्च १४,७०२ रुपयांवर येतो. अशी कपात करत गेल्याने वर्षाच्या शेवटी कोणतीही मोठी तडजोड न करता एकूण १,७०४ रुपयांची अतिरिक्त बचत होते.

३. झिरो-बेस्ड बजेटिंगमुळे तुमच्याकडे एक नियोजित अतिरिक्त रक्कम तयार होते आणि १ टक्के नियमामुळे ती रक्कम दरमहा हळूहळू वाढत जाते. हा वाढणारा निधी नियमितपणे एसआयपीच्या माध्यमातून गुंतवला जातो, तेव्हा त्याचे परिणाम दीर्घकाळात थक्क करणारे असतात.

समजा, एका गुंतवणूकदाराने दरमहा ६,००० रुपयांची एसआयपी सुरू केली आणि या नियमांचा वापर करून दरवर्षी त्यात छोटी वाढ केली:

वर्ष १: दरमहा ६,००० रुपये एसआयपी (वार्षिक गुंतवणूक ७२,००० रुपये) - वर्षाच्या शेवटी मूल्य ७६,०९५ रुपये.

वर्ष २: दरमहा ७,७०० रुपये एसआयपी (वार्षिक गुंतवणूक ९२,४०० रुपये) - वर्षाच्या शेवटी मूल्य १,८३,४०१ रुपये.


वर्ष ३: दरमहा ८,००० रुपये एसआयपी (वार्षिक गुंतवणूक ९६,००० रुपये) - वर्षाच्या शेवटी मूल्य ३,०८,१२१ रुपये.

### ■ गुंतवणूक

वार्षिक १२ टक्के परतावा गृहीत धरल्यास, १० वर्षांच्या शेवटी हा निधी जवळपास १७.५ लाख रुपये होतो. जर त्या गुंतवणूकदाराने एसआयपीची रक्कम ६,००० रुपयांवरच स्थिर ठेवली असती, तर हा निधी केवळ १३.४ लाख रुपये झाला असता. म्हणजेच, केवळ १ टक्के नियमाच्या शिस्तीमुळे तब्बल ४ लाख रुपयांचा अतिरिक्त फायदा होतो. शाश्वत संपत्ती निर्मितीसाठी कोणत्याही मोठ्या पगाराच्या वाढीची वाट न पाहता, आजपासूनच आपल्या खर्चाचा मागोवा घेणे आणि १ टक्क्यांची छोटी बचत करणे हाच सर्वात सुरक्षित मार्ग आहे.

**वैयक्तिक कर्ज हे कोणत्याही सुरक्षिततेशिवाय (विनातारण) दिले जाणारे कर्ज असल्याने बँका आणि वित्तीय संस्था कर्जदाराचा सिबिल स्कोअर अत्यंत महत्त्वाचा मानतात. सामान्यतः ७५० किंवा त्यापेक्षा जास्त सिबिल स्कोअर असल्यास बँका सहज आणि कमी व्याजदरात कर्ज मंजूर करतात. परंतु, जर एखाद्या व्यक्तीचा सिबिल स्कोअर कमी असेल (उदा. ५५० ते ६५० दरम्यान), तर पारंपरिक बँकांकडून कर्ज मिळणे कठीण होते. असे असले तरी, काही विशेष प्रक्रिया आणि तज्ज्ञांनी सुचवलेल्या मार्गांचा अवलंब करून कमी सिबिल स्कोअर असतानाही वैयक्तिक कर्ज मिळवणे शक्य आहे.**

## सिबिल स्कोअर चांगला नसतानाही पर्सनल लोन मिळू शकतं?




**कमी सिबिल स्कोअर असताना वैयक्तिक कर्ज मिळवण्याचे मार्ग**

एनबीएफसी आणि फिनटेक कंपन्यांकडे अर्ज: मोठ्या सार्वजनिक किंवा खाजगी बँकांच्या तुलनेत नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपन्या आणि नवीन तंत्रज्ञानावर आधारित फिनटेक कर्जदार संस्थांचे नियम थोडे लवचिक असतात. हे कर्जदार केवळ सिबिल स्कोअर न पाहता अर्जदाराचे मासिक उत्पन्न आणि नोकरीची स्थिरता या गोष्टींचाही विचार करतात. मात्र, येथे व्याजदर बाजारातील सामान्य दरापेक्षा जास्त असू शकतो.

सह-अर्जदार किंवा जामीनदार जोडणे: कमी सिबिल स्कोअरवर कर्ज मिळवण्याचा हा एक अत्यंत प्रभावी मार्ग आहे. जर तुम्ही तुमच्या कुटुंबातील अशा एखाद्या सदस्याला सह-अर्जदार बनवले ज्यांचे उत्पन्न नियमित आहे आणि सिबिल स्कोअर उत्तम (७५०+) आहे, तर बँक कर्ज देण्यास तयार होते. यामुळे बँकेची जोखीम कमी होते.

**उत्पन्नाचे भक्कम पुरावे सादर करणे** : जर तुमचा सिबिल स्कोअर भूतकाळातील एखाद्या चुकीमुळे (उदा. जुने क्रेडिट कार्ड बिल किंवा वादग्रस्त कर्ज) कमी झाला असेल, परंतु सध्या तुमचे उत्पन्न चांगले असेल, तर तुम्ही ते सिद्ध करू शकता. पगारवाढीचे पत्र, बँक खात्याचे तपशील (बँक स्टेटमेंट) आणि अतिरिक्त उत्पन्नाचे स्त्रोत दाखवून तुम्ही कर्ज फेडण्याची क्षमता सिद्ध करू शकता.

**कमी रकमेच्या कर्जासाठी अर्ज करणे:** कमी सिबिल स्कोअर असताना थेट मोठ्या रकमेच्या कर्जासाठी अर्ज केल्यास बँक तो फेटाळण्याची शक्यता जास्त असते. याऐवजी, सुरुवातीला लहान रकमेच्या कर्जासाठी (मायक्रो लोन) अर्ज करावा. लहान कर्ज मंजूर होण्याची शक्यता जास्त असते आणि ते वेळेवर फेडून सिबिल स्कोअर सुधारता येतो.

तारणावर आधारित कर्ज

### ■ जाणून घ्या

कमी सिबिल स्कोअरमुळे विनातारण वैयक्तिक कर्ज मिळत नसेल, तर तज्ज्ञ 'सिक्योर्ड लोन' घेण्याचा सल्ला देतात. यामध्ये कर्जदाराला बँकेकडे काहीतरी गहाण किंवा तारण ठेवावे लागते. यामध्ये सिबिल स्कोअरला कमी महत्त्व दिले जाते, कारण बँकेकडे सुरक्षितता असते. तुमच्या नावावर असलेल्या मुदत ठेवीच्या किंवा एंडोमेंट विमा पॉलिसीच्या मूल्याच्या ७० ते ९०टक्क्यांपर्यंत कर्ज बँका सहज देतात. याचा व्याजदरही वैयक्तिक कर्जापेक्षा खूप कमी असतो.

भारतात सोने तारण ठेवून अवघ्या काही तासांत कर्ज मिळते. यामध्ये सिबिल स्कोअर अजिबात पाहिला जात नाही, केवळ सोन्याची शुद्धता आणि वजन विचारात घेतले जाते.

### लक्षात ठेवण्याच्या गोष्टी

कमी सिबिल स्कोअरवर कर्ज घेताना गुंतवणूकदार किंवा कर्जदाराला काही आर्थिक भुर्दंड सहन करावा लागू शकतो. बँका किंवा वित्तीय संस्था अशा प्रकरणांमध्ये जास्त जोखीम घेत असल्याने, त्या व्याजदर सामान्यपेक्षा तीन ते आठ टक्क्यांपर्यंत जास्त आकारू शकतात. याव्यतिरिक्त, कर्ज प्रक्रियेचे शुल्क देखील जास्त असू शकते. तसेच, कर्ज मिळवण्यासाठी एकाच वेळी अनेक बँकांकडे अर्ज करणे टाळावे. प्रत्येक अर्जासोबत बँका तुमचा सिबिल रिपोर्ट तपासतात, ज्याला 'हार्ड इन्क्वायरी' म्हणतात. यामुळे सिबिल स्कोअर आणखी कमी होतो. कमी सिबिल स्कोअर असताना पहिल्यांदा स्वतःचा क्रेडिट रिपोर्ट तपासून त्यातील चुका दुरुस्त करणे आणि उत्पन्नाच्या आधारे योग्य कर्जदाराची निवड करणे हाच योग्य मार्ग आहे.



## व्याजदरवाढीच्या काळात कर्जदारांनी काय करावे?

पश्चिम आशियातील युद्ध आणि वाढत्या महागाईच्या सावलीत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून म्हणजेच आरबीआयकडून रेपो दरात वाढ केली जाण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. चालू आर्थिक वर्षात व्याजदर ५.२५ टक्क्यांवरून ६ टक्क्यांपर्यंत जाण्याचा अंदाज वित्तीय तज्ज्ञांनी वर्तवला आहे. व्याजदर वाढीचा हा काळ सर्वसामान्य कर्जदारांसाठी निश्चितच आव्हानात्मक ठरणार आहे. अशा बदलत्या आर्थिक परिस्थितीत जुन्या आणि नवीन कर्जदारांनी नेमकी कोणती पावले उचलावीत आणि आपल्या आर्थिक नियोजनात काय बदल करावेत, याविषयी...

ज्यांनी आधीच गृहकर्ज किंवा वाहनकर्ज घेतले आहे, त्यांच्यासमोर वाढत्या हप्त्यांचे म्हणजेच ईएमआयचे व्यवस्थापन कसे करावे, हा प्रश्न आहे. ज्या कर्जदारांचे कर्ज फ्लोटिंग रेट म्हणजेच बदलत्या व्याजदरावर आधारित आहे, त्यांच्या कर्जाचे व्याजदर आरबीआयच्या वाढीसोबत लगेचच वाढतील.

अशा कर्जदारांकडे दोन पर्याय उपलब्ध असतात.

१) ईएमआयची रक्कम वाढवणे आणि दुसरा पर्याय म्हणजे कर्जाचा कालावधी वाढवणे. बँका सामान्यतः कालावधी वाढवण्यास प्राधान्य देतात, परंतु यामुळे कर्जदारावर व्याजाचा एकूण बोजा प्रचंड वाढतो. त्यामुळे शक्य असल्यास कर्जदारांनी ईएमआयची रक्कम वाढवून घेण्याचा निर्णय घ्यावा, जेणेकरून कर्जाचा कालावधी वाढणार नाही आणि एकूण व्याजाची बचत होईल.

याशिवाय, जुन्या कर्जदारांनी आपल्या बँकेशी संपर्क साधून चालू व्याजदराची पुनर्रचना म्हणजेच लोन रिसेट करण्याचा पर्याय निवडावा. यासाठी बँका काही नाममात्र शुल्क आकारून चालू बाजाराच्या तुलनेत कमी व्याजदर देऊ शकतात.

नवीन कर्जदारांसाठी हा काळ अधिक महत्त्वाचा आहे. नवीन कर्ज घेताना फिक्स रेट म्हणजेच स्थिर व्याजदर आणि 'फ्लोटिंग रेट म्हणजेच बदलता व्याजदर यामधील निवड अत्यंत विचारपूर्वक करावी लागेल. व्याजदर वाढीच्या सुरुवातीच्या काळात 'फिक्स रेटचा पर्याय आकर्षक वाटू शकतो, कारण यामध्ये भविष्यातील व्याजदर वाढीपासून संरक्षण मिळते. परंतु, बँका सामान्यतः फिक्स रेटवर फ्लोटिंग रेटपेक्षा १ ते २ टक्के अधिक व्याजदर आकारतात. तसेच, हा फिक्स रेट संपूर्ण कर्ज कालावधीसाठी नसून केवळ काही वर्षांसाठीच स्थिर असतो, त्यानंतर तो पुन्हा बदलत्या दरात रूपांतरित होतो. त्यामुळे नवीन कर्जदारांनी सध्याच्या परिस्थितीतही फ्लोटिंग रेट निवडणे

### ■ बँकिंग

अधिक फायदेशीर ठरू शकते. कारण भविष्यात जेव्हा जागतिक परिस्थिती सुधारेल आणि आरबीआय पुन्हा व्याजदर कमी करेल, तेव्हा त्याचा थेट फायदा कर्जदाराला मिळेल. दोन्ही प्रकारच्या कर्जदारांसाठी

सर्व कर्जदारांनी आपल्या एकूण कर्जाची अंशतः परतफेड म्हणजेच 'पार्ट पेमेंट करण्यावर भर दिला पाहिजे. बोनस, गुंतवणूक परतावा किंवा अतिरिक्त बचतीमधून वर्षातून एकदा किंवा दोनदा कर्जाची काही रक्कम अंशतः भरल्यास मुद्दल कमी होते, ज्यामुळे एकूण व्याज आणि कर्जाचा कालावधी दोन्ही वेगाने कमी होतात.

याशिवाय, जर आपल्या बँकेचा व्याजदर इतर बँकांच्या तुलनेत खूप जास्त असेल, तो 'लोन बॅलन्स ट्रान्सफर'चा पर्याय निवडून आपले कर्ज कमी व्याजदर असलेल्या बँकेत वर्ग करावे. शेवटी, नवीन कर्ज घेणाऱ्यांनी आपल्या उत्पन्नाच्या केवळ ३० ते ४० टक्क्यांपेक्षा जास्त ईएमआय जाणार नाही, याची काळजी घ्यावी आणि बाजारातील स्पर्धा पाहून विविध बँकांच्या व्याजदरांची सखोल तुलना करूनच अंतिम निर्णय घ्यावा.



## गुंतवणुकीतील पहिला टप्पा महत्त्वाचा

गुंतवणुकीच्या प्रवासात पहिला १ कोटी रुपयांचा टप्पा पार करणे हा सर्वात कठीण टप्पा मानला जातो. या सुरुवातीच्या टप्प्यात पोर्टफोलिओची वाढ पूर्णपणे तुमच्या परताव्यापेक्षा (रिटर्न्स) तुमच्या नियमित बचतीवर आणि गुंतवणुकीवर अवलंबून असते. सुरुवातीला भांडवल शून्य असणे, मर्यादित उत्पन्न आणि बाजारातील अनुभवाचा अभाव यामुळे हा प्रवास अत्यंत संथ वाटतो. परंतु, एकदा का हा पहिला टप्पा पूर्ण झाला, की चक्रवाढ व्याजाचा (कम्पाउंडिंग) वेग कमालीचा वाढतो आणि पुढील संपत्ती वेगाने निर्माण होते.

चक्रवाढ व्याजाचे काम समजून घेण्यासाठी एक साधे उदाहरण पाहू. जर १ रुपया दररोज दुप्पट केला, तर पहिल्या ५ व्या दिवशी तो केवळ १६ रुपये होतो, १० व्या दिवशी ५१२ रुपये होतो आणि २० व्या दिवशी ५.२४ लाख रुपयांपर्यंत पोहोचतो. परंतु, खरी जादू शेवटच्या १० दिवसांत होते, जिथे ३० व्या दिवशी ही रक्कम ५३.६९ कोटी रुपयांच्या पार जाते. यावरून हे स्पष्ट होते की, एकूण संपत्तीचा पहिला अर्धा हिस्सा तयार करण्यासाठी अनेक वर्षे लागतात, तर उर्वरित दुसरा अर्धा हिस्सा अवघ्या काही वर्षांत तयार होतो.

### ■ लक्षात ठेवा

जर इक्विटी म्युच्युअल फंडामध्ये दरमहा ३०,००० रुपयांची एसआयपी सुरू केली आणि त्यावर वार्षिक १२ टक्के परतावा गृहीत धरला, तर पहिला १ कोटी रुपयांचा टप्पा गाठण्यासाठी जवळपास १२ ते १३ वर्षे लागतात. हा कालावधी एकूण ३० वर्षांच्या गुंतवणूक प्रवासाचा जवळपास ४०% हिस्सा असतो. मात्र, चक्रवाढ व्याजाच्या प्रभावामुळे दुसरा कोटी मिळवण्यासाठी अवघी ४ वर्षे लागतात, तिसरा कोटी ३ वर्षांत जमा होतो आणि त्यानंतर प्रत्येक कोटीचा टप्पा आधीपेक्षा खूपच कमी कालावधीत पार केला जातो.

करिअरच्या सुरुवातीला पैसे वाचवणे कठीण जाण्याची मुख्य कारणे म्हणजे कमी वेतन, महागाईचा वाढता आलेख आणि बाजारातील अनुभवाचा अभाव ही आहेत. सुरुवातीच्या काळात गुंतवणुकीचे मूल्य संथ गतीने वाढत असल्याने अनेक गुंतवणूकदार निराश होतात आणि बाजारातील चढ-उतारांना घाबरून आपली एसआयपी बंद करतात किंवा पोर्टफोलिओ विकून बाहेर पडतात. ही मानवी मानसिकता आणि वर्तणूक चक्रवाढ व्याजाच्या प्रक्रियेत मोठा अडथळा ठरते.

हा टप्पा जलद गतीने पार करण्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे. गुंतवणुकीत सातत्य आणि संयम राखणे सर्वात महत्त्वाचे आहे. उत्पन्नामध्ये वाढ होईल तशी दरवर्षी आपल्या एसआयपीची रक्कम १० टक्क्याने वाढवणे (स्टेप-अप एसआयपी) हा १ कोटी रुपयांचा टप्पा वेगाने गाठण्याचा एक उत्तम मार्ग आहे. यासोबतच, अनावश्यक खर्च टाळून वर्तमानात संयम राखणे आणि स्वतःच्या कौशल्यांचा विकास करून उत्पन्नाचे स्त्रोत वाढवणे फायदेशीर ठरते.

दुसरीकडे, हा टप्पा गाठताना काही चुका टाळणे अत्यंत गरजेचे आहे. झटपट पैसे कमावण्याच्या नादात फ्युचर्स अँड ऑप्शन्स (एफअँडओ), क्रिप्टो किंवा अतिजोखमीच्या पर्यायांमध्ये गुंतवणूक करणे टाळले पाहिजे. वॉरन बफे यांच्या सिद्धांतानुसार, ज्या व्यवसायांची किंवा उत्पादनांची आपल्याला पूर्ण माहिती नाही, तिथे पैसे गुंतवणे टाळले पाहिजे. तसेच, बाजारात गुंतवणूक करण्यासाठी 'योग्य वेळेची' वाट पाहत बसण्याऐवजी नियमित गुंतवणूक करत राहणे योग्य ठरते. जगातील मोठे श्रीमंत आणि यशस्वी गुंतवणूकदार याच सूत्राचा वापर करून दीर्घकाळात आपली संपत्ती वाढवतात.

## निवृत्तीनंतर क्रेडिट कार्ड वापरताना...

निवृत्तीनंतर नियमित पगाराचे उत्पन्न थांबत असल्याने क्रेडिट कार्ड वापरावे की नाही, असा प्रश्न अनेक ज्येष्ठ नागरिकांना पडतो. दैनंदिन गरजा, किराणा आणि वीज-पाणी यांसारख्या सेवांची बिले भरण्यासाठी क्रेडिट कार्ड हा एक अत्यंत सोयीचा आणि सुरक्षित मार्ग आहे. यामुळे सोबत रोख रक्कम बाळगण्याची गरज उरत नाही.

ज्येष्ठ नागरिकांना सर्वाधिक लागणाऱ्या गोष्टींवर, जसे की औषधे, रुग्णालयांचे खर्च, रेल्वे किंवा विमानाचे तिकीट आणि किराणा सामानावर विविध बँक कार्डे आकर्षक कॅशबॅक, डिस्काउंट आणि रिवॉर्ड पॉइंट्स देतात, ज्यामुळे खर्चात बचत होते. अचानक उद्भवणाऱ्या वैद्यकीय संकटांच्या वेळी किंवा आरोग्याशी संबंधित तातडीच्या खर्चासाठी क्रेडिट कार्ड एक तात्पुरते आर्थिक सुरक्षा कवच म्हणून काम करते. यामुळे बँक खात्यातील मुदत ठेव (एफडी) त्वरित मोडावी लागत नाही.

निवृत्तीनंतरही योग्य वेळी बिले भरून चांगला क्रेडिट स्कोअर (सिबिल स्कोअर) राखता येतो. यामुळे भविष्यात गरज पडल्यास ज्येष्ठ नागरिकांनाही बँकांकडून कर्ज मिळणे सोपे होते.

निवृत्त व्यक्तींकडे नियमित पगाराचा पुरावा नसल्यास, बँका त्यांच्या बँक मुदत ठेवीच्याबदल्यात 'सिक्योर्ड क्रेडिट कार्ड' देतात, जे मिळवणे अत्यंत सोपे असते. असे असले तरी निवृत्तीनंतरचे उत्पन्न मर्यादित किंवा निश्चित असते. अशा



### ■ अर्थसल्ला

वेळी खरेदीवर नियंत्रण राहिले नाही किंवा अनपेक्षित खर्च वाढले, तर क्रेडिट कार्डचे बिल थकण्याची शक्यता असते. केवळ 'किमान देय रक्कम' भरल्यास उर्वरित रकमेवर वार्षिक ४० ते ४५ टक्क्यांपर्यंत प्रचंड व्याज आकारले जाते, ज्यामुळे व्यक्ती कर्जाच्या विळख्यात अडकू शकते.

**सायबर फसवणूक आणि स्कॅम :** ज्येष्ठ नागरिक अनेकदा ऑनलाइन फसवणूक, फिशिंग आणि सायबर गुन्हेगारांचे सोपे लक्ष्य बनतात. केवायसी अपडेट करणे, क्रेडिट कार्डची मर्यादा वाढवणे किंवा बँक एक्झिक्युटिव्ह बनून येणाऱ्या बनावट फोन कॉल्स आणि लिंक्समुळे संपूर्ण आयुष्यभराची पुंजी गमावण्याचा मोठा धोका असतो. क्रेडिट कार्डच्या नियमांची पूर्ण माहिती नसल्यास वार्षिक शुल्क, लेट पेमेंट फी आणि इतर छुपे चार्जेस यामुळे आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. वेळेवर पैसे न भरल्यास बँकांचे वसुलीचे नियमही अत्यंत कडक असतात, ज्यामुळे मानसिक ताण वाढू शकतो. ज्येष्ठ नागरिकांनी आपल्याकडे केवळ एक किंवा जास्तीत जास्त दोनच कमी वार्षिक शुल्क असणारी क्रेडिट कार्डे ठेवावीत. कार्डचा वापर केवळ आधीच ठरवलेल्या बजेटनुसार आणि नियमित खर्चासाठीच करावा. कोणत्याही अनोळखी व्यक्तीसोबत आपला ओटीपी, कार्ड नंबर किंवा सीव्हीव्ही शेअर करू नये. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, दरमहा येणारे क्रेडिट कार्डचे बिल शेवटच्या तारखेची वाट न पाहता पूर्णपणे चुकते करावे, जेणेकरून व्याजाचा कोणताही बोजा पडणार नाही. योग्य आर्थिक शिस्त आणि सुरक्षिततेचे नियम पाळल्यास क्रेडिट कार्ड निवृत्तीनंतरच्या जीवनात आर्थिक सुटसुटीतपणा आणणारे एक उत्तम साधन ठरू शकते.




## टॅक्स रिबेटमधील अटींची मेख

नवीन कर रचनेत १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर टॅक्स रिबेट मिळणार आहे, ही बातमी गुंतवणूकदारांसाठी आनंदाची ठरली आहे; पण हा फायदा सरसकट मिळणार नाहीये. त्यासाठी काही अटी घालण्यात आल्या आहेत.

उदाहरणार्थ, देशांतर्गत इक्विटीचा हिस्सा ३५ टक्क्यांपेक्षा कमी असणाऱ्या डेट म्युच्युअल फंडांना होणारा नफा थेट आपल्या नियमित वार्षिक उत्पन्नात जोडला जातो.

तुमचा पगार, व्यवसाय आणि डेट फंडातील नफा मिळून एकूण वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल, तर नवीन कर रचनेत कलम ८७अ अंतर्गत पूर्ण रिबेट मिळेल. अशा परिस्थितीत, तुम्हाला डेट फंडाच्या नफ्यावर कोणताही कर भरावा लागणार नाही. पण समजा तुमचे वार्षिक पगार ११,५०,००० रुपये आहे आणि तुम्हाला या वर्षी डेट फंडातून ६०,००० रुपयांचा नफा झाला. यामुळे तुमचं एकूण उत्पन्न १२,१०,००० रुपये होईल. यामुळे, तुम्ही कलम ८७अ अंतर्गत मिळणाऱ्या रिबेटच्या कक्षेबाहेर जाल. अशा परिस्थितीत, तुम्हाला केवळ १२ लाखांच्या वर असलेल्या रकमेवरच नाही, तर नवीन टॅक्स स्लॅबनुसार तुमच्या संपूर्ण उत्पन्नावर कर भरावा लागेल.

# शासकीय नोकरीसाठी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडूंचे मुंबईतील आझाद मैदानात ११ जूनपासून 'बेमुदत उपोषण'

नगर – राज्याचा सर्वोच्च क्रीडा सन्मान असलेल्या शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू आणि आंतरराष्ट्रीय–राष्ट्रीय स्तरावरील गुणवंत खेळाडूंना आजही रोजगारासाठी संघर्ष करावा लागत आहे. आपल्या हक्काच्या मागण्यांसाठी आता हे खेळाडू आक्रमक झाले असून, ११ जून पासून मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाचे हत्यार उपसणार आहेत.

राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक महेश इंदापूरे आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेती ज्यूदोपटू सुरेखा शिरसाट यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार आहे. हरियाणा आणि पंजाब राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांना थेट शासकीय सेवेत नियुक्ती द्यावी, ही या आंदोलनाची मुख्य मागणी आहे. याबाबत त्यांनी शासनाला निवेदन दिले आहे. शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांना थेट शासकीय सेवेत नियुक्ती देण्यात यावी. सध्याचे ५% क्रीडा आरक्षण वाढवून ते १०% करण्यात यावे आणि त्याचा लाभ केवळ पात्र खेळाडूंनाच मिळावा यासाठी कडक नियम असावेत. लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर लाडकी खेळाडू योजना सुरू करावी आणि खेळाडूंसाठी मुख्यमंत्री क्रीडा मंत्री सहायता निधी कार्यान्वित करावा. राष्ट्रीय पदक विजेत्यांना १ लाख रुपये शिष्यवृत्ती मिळावी आणि शालेय स्पर्धेतील पंचांचे किमान दैनिक मानधन १००० रुपये करावे. शिक्षण व गौरव: १० वी व १२ वीच्या सीबीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांना क्रीडा गुण मिळावेत, बाल खेळाडूंना युवराज छत्रपती संभाजीराजे पुरस्कार तात्काळ मिळावा, तसेच छत्रपती संभाजीनगर येथील क्रीडा संकुलाला युवराज छत्रपती संभाजीराजे यांचे नाव देण्यात यावे. सुहास पाटील यांचे निलंबन, सोपान कट्‌के यांची बेकायदेशीर संलग्नता रद्द करणे तसेच क्रीडा क्षेत्रातील घराणेशाही व हुकूमशाही थांबविण्याची मागणी खेळाडूंनी केली आहे. राज्य आणि देश–विदेशात महाराष्ट्राचे नाव उंचावणाऱ्या खेळाडूंवर उपासमारीची वेळ येणे ही दुर्दैवी बाब आहे. जोपर्यंत शासन ठोस निर्णय घेत नाही, तोपर्यंत हे आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा पवित्रा आयोजकांनी घेतला आहे.

या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी विविध क्रीडा संघटना, क्रीडाप्रेमी नागरिक आणि प्रसारमाध्यमांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महेश इंदापूरे व सुरेखा शिरसाट यांनी केले आहे.

# शहरातील ओढे–नाले बुजविणाऱ्यांना संरक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा : आ. संग्राम जगताप



एकविरा चौक ते तपोवन रस्त्याची पाहणी करताना आमदार संग्राम जगताप. समवेत महापौर ज्योतीताई गाडे, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक निखिल वारे आदी. (छाया – लहू दळवी)

नगर – राज्य शासनाच्या माध्यमातून शहरातील विकास आराखड्यातील (डीपी) रस्त्यांच्या कामांसाठी तब्बल दीडशे कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. शहराच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्था, नियोजनबद्ध विकास आणि नागरिकांच्या सोयीसाठी ही कामे सुरू करण्यात आली. मात्र काही रस्त्यांची कामे अद्याप प्रलंबित आहेत तर काही रस्त्यांची कामे अर्धवट अवस्थेत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यासाठी महापालिकेच्या नगररचना विभागाने वेळेत लाईनआऊट देणे आणि अतिक्रमण विभागाने अडथळे दूर करणे गरजेचे असताना संबंधित विभागांकडून होत असलेल्या हलगर्जीपणामुळे विकासकामांना अडथळे निर्माण होत असल्याची तीव्र नाराजी आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केली.

आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून सुरू असलेल्या एकविरा चौक ते तपोवन रोड दरम्यानच्या काँक्रिटीकरण रस्ता कामाची पाहणी करण्यात आली. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, महेश तवले, सुनील त्रिंबके ऋग्वेद गंधे, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, किशोर डागवले, अविनाश घुले, गणेश कवडे, महेश लोंढे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, मनोज पारखे, इंजिनिअर आदित्य बल्लाळ, इंजिनिअर गणेश गाडळकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शहरातील विकासकामे ही पुढील वीस वर्षांचा विचार करून कायमस्वरूपी आणि नियोजनबद्ध पद्धतीने केली जात आहेत. मात्र महापालिकेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या कारभारामुळे ही कामे रखडत आहेत. रस्ते विकासासाठी आवश्यक असलेले लाईनआऊट वेळेत दिले जात नाहीत, अतिक्रमण हटविले जात नाही आणि त्यामुळे ठेकेदारांना काम करताना अडचणी येतात. काही ठिकाणी कामे सुरू होतात आणि अचानक थांबतात. यामुळे नागरिकांना वाहतुकीचा त्रास सहन करावा लागत असून व्यापाऱ्यांनाही आर्थिक फटका बसत आहे.

ते पुढे म्हणाले की, ठेकेदारांनी लाईनआऊट मिळाल्याशिवाय काम सुरू करू नये आणि एकदा काम सुरू केल्यावर ते अर्धवट सोडू नये. शहरातील सर्व प्रलंबित रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करून नागरिकांसाठी खुली करण्यात यावीत. महापालिका अतिक्रमण विभाग आणि नगररचना विभागातील अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या कारभारामुळे विकासकामांना अडथळे निर्माण होत असल्याने त्यांच्या विरोधात शासनाकडे कारवाईची मागणी करण्यात येणार आहे.

आमदार संग्राम जगताप यांनी यावेळी गंभीर आरोप करत सांगितले की, शहरातील अनेक ओढे आणि नाले बुजविण्याच्या प्रकारांना काही अधिकाऱ्यांचे अप्रत्यक्ष संरक्षण मिळत आहे. त्यामुळे पावसाळ्यात नागरिकांच्या घरात पाणी शिरण्याच्या घटना घडत आहेत. शहरातील ओढे–नाले बुजविणाऱ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणीही शासनाकडे करण्यात येणार आहे. स्वतःची जबाबदारी झटकून एकमेकांवर दोषारोप करण्याचे काम काही अधिकारी करत असून नागरिकांची दिशाभूल केली जात आहे.

एकविरा चौक ते तपोवन रोड हा रस्ता मूळ आराखड्यानुसार २४ मीटर रुंदीचा असताना प्रत्यक्षात तो १५ ते १७ मीटरच भरला जात असल्याबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. महापालिकेची मालकी नेमकी कुठपर्यंत आहे हे आधी निश्चित करूनच पुढील विकासकामे करण्यात यावीत, अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. तसेच पावसाळा सुरू झालेला असल्याने नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची विशेष काळजी घेण्याचे आदेशही त्यांनी दिले.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, आमदार संग्राम जगताप यांनी शहरातील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी राज्य शासनाकडून मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र रस्त्यांची कामे संथ गतीने सुरू असून महापालिका प्रशासन व ठेकेदारांकडून अपेक्षित वेग दिसून येत नाही. पावसाळा सुरू झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय वाढली आहे.

एकविरा चौक ते तपोवन रोड या रस्त्याची पाहणी करून विविध सूचना देण्यात आल्या असून हे काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अर्धवट खोदलेले रस्ते, वाहतुकीच्या अडचणी आणि व्यापाऱ्यांचे नुकसान या समस्या त्वरित सोडविण्यासाठी प्रशासनाने कामाला गती देणे आवश्यक आहे. शहरातील सर्व प्रलंबित रस्त्यांची कामे लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

नगरसेवक निखिल वारे यांनी यावेळी नगररचना विभागाच्या कारभारावर तीव्र टीका केली. ते म्हणाले की, एकविरा चौक ते तपोवन रोड हा रस्ता २४ मीटरचा असताना प्रत्यक्षात पूर्ण रुंदीने विकसित होत नाही. त्यामुळे महापालिकेची जागा नेमकी कुठे गेली हा प्रश्न निर्माण झाला आहे.

नगररचना विभागातील अधिकारी–कर्मचारी चुकीच्या पद्धतीने काम करत असल्यामुळे अनेक बांधकामांना परवानग्या दिल्या जात आहेत. विभागाचा गलथान कारभार महापालिकेच्या मोठ्या नुकसानीस कारणीभूत ठरत आहे. गोरगरीबांची अतिक्रमणे तातडीने हटविली जातात; मात्र धनदांडग्यांना संरक्षण दिले जाते. चुकीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी यासाठी आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून राज्य शासनाकडे तक्रार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरसेवक बाळासाहेब पवार म्हणाले की, या रस्त्यालगतचे अनेक ओढे व नाले बुजविण्यात आल्यामुळे पावसाचे पाणी नागरिकांच्या घरात शिरत आहे. ही गंभीर समस्या असून त्यावर तातडीने उपाययोजना होणे आवश्यक आहे. पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह मोकळा करून देणे गरजेचे आहे.

आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरातील रस्त्यांची कामे सुरू झाली असून ती तातडीने पूर्ण होणे आवश्यक आहे. महापालिका प्रशासन आणि ठेकेदारांनी जलद गतीने कामे पूर्ण करावीत. पुढील अनेक वर्षांचा विचार करून कायमस्वरूपी आणि नियोजनबद्ध विकासकामे करण्यात यावीत. सध्या रस्त्यांची कामे संथ गतीने सुरू असल्याने नगरसेवकांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नागरिकांच्या दळणवळणासाठी तातडीने पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

# पोलिसांना खबर देतो म्हणून तरुणावर केला प्राणघातक हल्ला

## कोठला परिसरातील घटना, ३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर –पोलीसांना खबरी देतो आणि जुन्या भांडणाचा राग मनात धरून एका २९ वर्षीय ड्रायव्हरवर लोखंडी रॉड आणि धारदार हत्याराने प्राणघातक हल्ला केल्याची घटना ७ जून रोजी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास कोठला परिसरातील सलीम भंगारवाला याच्या दुकानासमोर समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत साजिद ताहेर शेख (वय २९, रा. घासगल्ली, कोठला) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा ७ जून रोजी पहाटे तीन वाजेच्या सुमारास सलीम भंगारवाला यांच्या दुकानासमोर आला होता. त्यावेळी तिथे मस्तान चौक भागातील इरफान इकबाल शेख, अमीर सलीम शेख आणि पप्पू उर्फ खोजा शेख हे तिघे जण आले. 'तू पोलीसांना आमच्या खबरी का देतोस?' अशी विचारणा करत त्यांनी साजिद सोबत वाद घालण्यास सुरुवात केली. साजिदने आपण खबरी देत नसल्याचे सांगितले, मात्र आरोपींनी त्याचे काहीही ऐकले नाही.

यानंतर आरोपी इरफान शेख याने हातातील लोखंडी रॉडने साजिदच्या जबड्यावर, कमरेवर आणि दोन्ही गुडघ्यांवर जबर मारहाण केली. त्याच वेळी दुसरा आरोपी अमीर शेख याने धारदार हत्याराने साजिदच्या उजव्या हातावर वार करून त्याला गंभीर जखमी केले. तिसरा आरोपी पप्पू उर्फ खोजा शेख याने साजिदला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि 'याच्या बापाने मला मारले आहे, याला जीवे मारून टाका' अशी धमकी दिली.

या हल्ल्यानंतर जखमी साजिद शेख याला तातडीने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. तेथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत. शुद्धीवर आल्यानंतर साजिदने पोलिसांकडे तिघांच्या विरुद्ध तक्रार दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# ऑनलाईन संचमान्यतेच्या नावाने शिक्षकांचा 'अतिरिक्त' करण्याचा कारखाना बंद करावा

नगर – महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेत सध्या सुरू असलेल्या 'ऑनलाईन संचमान्यता' प्रक्रियेच्या विरोधात 'शिक्षक भारती'ने आक्रमक पवित्रा घेतला आहे. कोणताही पूर्वलिखित आदेश नसताना राबविल्या जाणाऱ्या या जाचक ऑनलाईन प्रक्रियेमुळे राज्यातील उच्च माध्यमिक शिक्षकांचे भवितव्य टांगणीला लागले असून, शिक्षक संघटनांनी सरकारला थेट इशारा दिला आहे.

### शिक्षकांना 'अतिरिक्त' ठरवण्याचे कारस्थान?

शिक्षक भारतीचे अध्यक्ष जयवंत भाबड यांनी शिक्षणमंत्री आणि शिक्षण आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात धक्कादायक आरोप केले आहेत. १५ मार्च २०२४ च्या संचमान्यता निकषांमुळे वाड्या–वस्त्यांवर शिकणाऱ्या शेतकरी, कामगार आणि बहुजन समाजाचे शिक्षण धोक्यात आले आहे. विशेषतः विज्ञान शाखेतील प्रात्यक्षिक कार्यभारात झालेली वाढ (२० वरून ४०) आणि नवीन निकषांमुळे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील हजारो शिक्षक 'अतिरिक्त' ठरणार आहेत.

### समायोजनाच्या नावाखाली भ्रष्टाचाराचा आरोप

गेल्या १० वर्षांपासून अनेक शिक्षक समायोजनाच्या प्रतीक्षेत आहेत, मात्र शिक्षण विभागात त्याबाबत कोणतेही योग्य नियोजन नाही. उलट, समायोजन प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक देवाण–घेवाण होत असल्याचा गंभीर आरोप शिक्षक भारतीच्या निवेदनात करण्यात आला आहे. सरकार ठोस उपाययोजना करण्याऐवजी जटिल अटी लादून शिक्षकांना अतिरिक्त ठरवण्याचा 'कारखाना' चालवत असल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

### 'ऑनलाईन'चा हट्ट सोडा, 'ऑफलाईन' प्रक्रिया राबवा

नीती आयोगाच्या अहवालाचा हवाला देत सरकारने शाळांच्या विलीनीकरणाचा धोरणात्मक निर्णय घेतला असला, तरी प्रत्यक्षात ही धोरणे उच्च माध्यमिक शिक्षणाची कंबर मोडणारी आहेत. त्यामुळे, ही अन्यायकारक ऑनलाईन संचमान्यता प्रक्रिया त्वरित थांबवून ती पारदर्शक 'ऑफलाईन' पद्धतीने करावी, अशी मागणी शिक्षक भारतीने शासनाकडे केली आहे.

### शिक्षक वर्गात असंतोष

या धोरणामुळे राज्यातील शिक्षकांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण झाला आहे. जर शासनाने यावर तातडीने निर्णय घेतला नाही, तर भविष्यात तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. आता शिक्षण मंत्रालय यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या निवेदनास आमदार कपिल पाटील, राज्य अध्यक्ष अशोक बेलसरे, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, विनाअनुदान कृती समिती राज्याध्यक्ष जयवंत भाबड, सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, महिला अध्यक्ष रूपालीताई बोरुडे, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, समन्वयक शरद पवार, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, प्रवीण मालुंजकर, साई थोरात, संपत वाळके, प्रवीण काळे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, दिगंबर देसाई, सचिव वंदना जाधव, कल्पना चौधरी, मफीज इनामदार, दीपक फापाळे, गणपत धुमाळ, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, श्याम जगताप आदी पदाधिकारी यांनी पाठिंबा दिला आहे

# निराधार योजनेच्या पैशांचे आमिष दाखवून वृद्ध महिलेची फसवणूक

नगर – संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे (डोल) पैसे आले असल्याचे आमिष दाखवत अनोळखी व्यक्तीने ७० वर्षीय वृद्ध महिलेची फसवणूक करून त्यांच्या अंगावरील ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना शहरातील मार्केट यार्ड परिसरात हमाल पंचायत जवळ घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत द्रोपदाबाई घोलप (रा. भातोडी पारगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या काही दिवस आपल्या नातीकडे वास्तव्यास होत्या. त्या ५ जून रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास आपल्या गावी जाण्यासाठी मार्केट यार्ड परिसरातील चिंचेच्या झाडाजवळ खासगी रिक्षा थांबतात त्या ठिकाणी आल्या होत्या. त्यांचे जावई ईश्वर वाघुले यांनी त्यांना रिक्षामध्ये बसवून दिल्यानंतर ते तेथून निघून गेले. याचवेळी एक अनोळखी इसम त्यांच्याजवळ आला. त्याने तुम्हाला तुमच्या मुलाने बोलावले आहे. तुमच्या डोलाचे पैसे आले आहेत, असे सांगून विश्वास संपादन केला. तसेच त्यांच्याकडे पैसे आहेत का, अशी विचारणा केली.

द्रोपदाबाईंनी आपल्याकडे पैसे नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्या इसमाने त्यांना आपल्या दुचाकीवर बसवून हमाल पंचायत मार्केट यार्ड परिसरात नेले. तेथे पोहोचल्यानंतर त्या व्यक्तीने गळ्यातील पानपोत आणि कानातील फुले काढून द्या, अन्यथा तुम्हाला पैसे मिळणार नाहीत, असे सांगितले. अचानक घडलेल्या प्रकारामुळे आणि संभ्रमावस्थेत असलेल्या वृद्ध महिलेला काही सुचेना. त्यामुळे त्यांनी गळ्यातील सात ग्रॅम वजनाचे सोन्याचे पानपोत तसेच तीन ग्रॅम वजनाची सोन्याची कानातील फुले त्या व्यक्तीच्या ताब्यात दिली. दागिने मिळताच संबंधित भामटा दुचाकीवरून तेथून पसार झाला.

# जिल्हा बास्केटबॉल संघ निवडसाठी नगरमध्ये १४ जूनला विशेष चाचणी

## राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंची होणार निवड

नगर – महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्या संयुक्त विद्यमाने, आगामी २३ ते २८ जून या दरम्यान राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या अहमदनगर जिल्हा संघाची निवड करण्यासाठी १४ जून रोजी विशेष निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.

अहमदनगर डिस्ट्रिक्ट बास्केटबॉल संघटना आणि अहमदनगर जिल्हा हौशी बास्केटबॉल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ही निवड चाचणी प्रक्रिया पार पडणार आहे. येथील वाडियापार्क मैदानावर ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. १६ वर्षांखालील मुले–मुली. खेळाडूंचा जन्म १ जानेवारी २०१० किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे.खेळाडूंनी निवड चाचणीसाठी येताना अधिसूचना क्रमांक/पुरावाची छायाप्रत (झेरॉक्स) आणि जन्माचा दाखला सोबत आणणे आवश्यक आहे.

निवड चाचणीच्या तांत्रिक बाबी आणि खेळाडूंच्या निवडीची जबाबदारी निवड समिती सदस्य चंद्रशेखर म्हस्के आणि सचिन आळकुटे हे पाहणार आहेत. या निवड चाचणीत जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी आणि संघांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अहमदनगर डिस्ट्रिक्ट बास्केटबॉल असोसिएशनचे सचिव कैलास शानबाग, सहसचिव संजय ढोणे तसेच अहमदनगर जिल्हा हौशी बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष पियुष लुंकड आणि सचिव मुकुंद काशीद यांनी केले आहे. राज्यस्तरीय स्पर्धेच्या दृष्टीने ही निवड चाचणी महत्त्वाची असून, इच्छुक खेळाडूंनी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या २२ वाहनचालकांवर कारवाई

## न्यायालयात करणार सादर

नगर – वाहतूक नियमांचे उल्लंघन करून अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध वाहतूक शाखेने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. ७ आणि ८ जून या दोन दिवसांच्या कालावधीत केलेल्या विशेष कारवाईत २२ वाहनचालकांना पकडण्यात आले असून, त्या सर्वांना न्यायालयात हजर केले जाणार आहे.

शहरातील वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी आणि अपघातांना आळा घालण्यासाठी शहर वाहतूक शाखेने बेशिस्त वाहन चालकांवर कारवाईची मोहिम सुरु असतानाच आता अवैध प्रवासी वाहतुकीवरही कारवाईचा बडगा उगारण्यात आला. गेल्या ३ दिवसांपासून वेगवेगळ्या ठिकाणी अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाईची मोहिम हाती घेण्यात आली. या मोहिमेदरम्यान २२ जणांना अवैध प्रवासी वाहतूक करताना पकडण्यात आले. यात आता वाहतूक शाखेकडून दंडात्मक कारवाई करण्याऐवजी संबंधितांना थेट न्यायालयात हजर करण्याची प्रक्रिया राबविली जाणार आहे.

वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वेगवेगळ्या ठिकाणी अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई करण्यात आली. विनापरवाना प्रवाशांची वाहतूक केली जात असताना २२ जणांना पकडण्यात आले. या २२ वाहनचालकांना संबंधित न्यायालयात सादर केले जाणार आहे. मोटार वाहन कायद्यातील तरतुदींनुसार, न्यायालय आता या वाहनचालकांना दंडाची शिक्षा सुनावू शकते. विशेष म्हणजे नियमित दंडापेक्षा हा दंड मोठ्या स्वरुपाचा असू शकेल, असेही सांगण्यात आले. वाहतूक शाखेच्या या कारवाईमुळे नियम पायदळी तुडवणाऱ्या वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत. यापुढेही वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# तलवारीसह फिरणाऱ्या तरुणाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

नगर –शहरातील ताठे मळा परिसरामध्ये विनापरवाना धारदार तलवार कमरेला लावून दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या एका २४ वर्षीय तरुणाला तोफखाना पोलिसांनी ७ जून रोजी सायंकाळी पकडले. निखिल दीपक जाधव (वय २९, रा. गणेश चौक, बोल्हेगाव, मूळ रा. भिंगार) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

ताठे मळा येथील पंपिंग स्टेशन रस्त्यावर एका लिंबाच्या झाडाजवळ एक तरुण कमरेला तलवार लावून फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांना मिळाली होती.

माहिती मिळताच त्यांनी तात्काळ गुन्हे शोध पथकाला कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोलीस अंमलदार सतीश त्रिभुवन, भानुदास खेडकर, भापसे, बांगर, अरुण गांगर्डे, शाकीर शेख, महिला पो. ना. जिजाबाई खुडे व सहकाऱ्यांनी पंचांसह ताठे मळा परिसरात सापळा रचला. संशयास्पद स्थितीत फिरणाऱ्या निखिल जाधव याला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली. त्याच्याकडे पोलिसांना ३५ इंच लांबीची धारदार तलवार मिळून आली. या तलवारीवर विशेष अक्षरे कोरलेली असून ती त्याने बेकायदेशीरपणे स्वतःजवळ बाळगली होती. पोलिसांनी ती १ हजार रुपये किमतीची तलवार आणि कव्हर जागीच जप्त केले.

आरोपीविरुद्ध महिला पोलीस कॉन्स्टेबल कल्पना एकनाथ अवसरे यांच्या फिर्यादी वरून शस्त्र बंदी कायद्याच्या उल्लंघनाखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास महिला पो. ना. जिजाबाई खुडे करत आहेत.

# स्क्रॅप वादातून नगरच्या व्यावसायिकाचे अपहरण

## साडेचार कोटींच्या खंडणीची मागणी; गुन्हा दाखल

नगर – स्क्रॅप मालाच्या व्यवहारातून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर येथील व्यावसायिकाचे अपहरण करून त्यांना मारहाण करत तब्बल साडेचार कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध ६ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रमेश मोहन बोगा (वय ३९, रा. श्रावस्ती बंगला, विद्या कॉलनी, आदर्शनगर, नेप्ती सबरबंद, नगर) यांनी फिर्याद दिली आहे. दिलेल्या फिर्यादीवरून संशयित आरोपी राजबीर गजराजसिंग मल्होत्रा, जुगन राजबीर मल्होत्रा (दोघे रा. मौर्य पार्क, वाडेबोल्हाई, वाघोली, पुणे), शिवाजी चंद्रकांत थोरवे (रा. आळंदी, पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, २९ मे रोजी पहाटे एकच्या सुमारास संशयित आरोपींनी फिर्यादी यांना त्यांच्या राहत्या घराजवळ गाठले. स्क्रॅप मालाचा व्यवहार न केल्याच्या रागातून संशयित आरोपींनी फिर्यादी यांना जबरदस्तीने वाहनात बसवून नेले.

यावेळी आरोपींनी फिर्यादींचे दोन मोबाईल तसेच खिशातील तीन हजार रुपये हिसकावून घेतले. यानंतर आरोपींनी फिर्यादी यांना आळंदी येथील एका फ्लॅटमध्ये नेऊन मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तुझ्यामुळे आमचे साडेचार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. ते पैसे भरून दे, अन्यथा तुला व तुझ्या कुटुंबाला जिवे मारू, अशी धमकी आरोपींनी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

